दैनिक
# जनता आवाज

## ऊसशेतात आढळला मानवी सांगाडा

**श्रीगोंदा :** तालुक्यातील उक्कडगाव शिवारातील गट क्रमांक ४३ मधील ऊसाच्या शेतात मानवी सांगाडा आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. शेतकरी दशरथ सोपान गोलांडे (वय ६९) हे ऊसशेतात गवत काढण्याचे काम करीत असताना त्यांना हा सांगाडा दिसून आला. त्यांनी तत्काळ बेलवंडी पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच बेलवंडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.सांगाड्याजवळ फिकट आकाशी रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट, विटकरी रंगाची अंडरवेअर, पांढरे बनियन आणि विटकरी रंगाची चप्पल आढळून आली आहे. मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जावेद शेख पुढील तपास करीत आहेत. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास ९८९०३२७०७२ किंवा ८८५७८८२२५५ या क्रमांकांवर बेलवंडी पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक १६१ वा | मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

**आजचे हवामान**
कमाल 27°C | किमान 23°C

| पेट्रोल | डिझेल |
|---|---|
| 111.21 | 97.83 |

| सोने | चांदी |
|---|---|
| 1,51,990 | 2,44,900 |

# व्हिडिओ नाही म्हणून चौकशीला ब्रेक?

## पोलीस अधिकाऱ्याच्या सत्कार सोहळ्याचे प्रकरण; डिजिटल पुरावे तपासण्याची गरज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर : पोलिस अधिकाऱ्याच्या वाढदिवसानिमित्त नेवाशातील एका प्रसिद्ध हॉटेलमध्ये झालेल्या सत्कार सोहळ्याच्या चौकशीचा मुद्दा आता पुन्हा चर्चेत आला आहे. या कार्यक्रमाबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी नीरज राजगुरू यांनी चौकशी करण्यात येईल, असे सांगितले होते. मात्र, आता संबंधित कार्यक्रमाचा व्हिडिओ उपलब्ध नसल्याने चौकशी पुढे नेण्यात अडचण येत असल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे व्हिडिओ उपलब्ध नाही म्हणून चौकशी थांबणार की, अन्य उपलब्ध पुराव्यांच्या आधारे वस्तुस्थिती तपासली जाणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.**




या प्रकरणी जनता आवाजने नेवासा पोलिस ठाण्याचे निरीक्षक प्रताप दराडे यांच्याशी संपर्क साधला. यावेळी संबंधित सत्कार सोहळ्याचा व्हिडिओ पोलिसांकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. दराडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या व्हिडिओबाबत दोन-तीन पत्रकारांशीही चर्चा करण्यात आली. मात्र त्यांच्याकडे संबंधित कार्यक्रमाचा व्हिडिओ उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे व्हिडिओ उपलब्ध नसताना चौकशी नेमकी कोणत्या आधारावर पुढे न्यावी, हा प्रश्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पोलिस निरीक्षकांची ही भूमिका समोर आल्यानंतर आता तपासाच्या कार्यपद्धतीबाबतच प्रश्न उपस्थित होत आहेत.

एखाद्या कार्यक्रमाचा व्हिडिओ उपलब्ध नसणे म्हणजे त्या कार्यक्रमाशी संबंधित अन्य कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत, असे मानता येईल का? हा मुख्य प्रश्न आहे. कार्यक्रम ज्या हॉटेलमध्ये झाला, तेथील सीसीटीव्ही फुटेज, कार्यक्रमाचे आयोजक, हॉटेल व्यवस्थापनाच्या नोंदी, उपस्थित व्यक्ती, छायाचित्रे तसेच सोशल मीडिया पोस्ट यांची पडताळणी करता येऊ शकते. त्यामुळे व्हिडिओ नाही या एका मुद्द्यावर चौकशीची दिशा थांबते का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

दरम्यान, शहरातील एका प्रसिद्ध हॉटेलच्या फेसबुक पेजवर ३० जुलै रोजी एक व्हिडिओ अपलोड झाल्याची चर्चा आहे. हा व्हिडीओ संबंधित सत्कार सोहळ्याचाच आहे की अन्य कार्यक्रमाचा, याबाबत अद्याप अधिकृत स्पष्टता झालेली नाही. मात्र त्या विषयी नेवाशात राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकात चर्चा सुरु आहे. या व्हिडिओमध्ये एका अभिनेत्याचा सत्कार होताना पोलिस अधिकारी दिसत असल्याची नागरिकांत चर्चा आहे.

कार्यक्रमातील जेवणावळीचे दृश्य असून सर्वत शेवटी तीन महिला, एक मुलगा व एक व्यक्तीसह सिनेअभिनेत्याचे चित्र दिसून येत असल्याची चर्चा आहे. व्हिडिओला सिंघम चित्रपटातील संगीत वापरण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र या सर्व बाबींची अधिकृत पडताळणी होणे गरजेचे आहे. व्हिडिओ संबंधित कार्यक्रमाचा असल्यास तो नेमका कधीचा आहे, कोणी शूट केला, कोणी अपलोड केला, त्याची मूळ प्रत कुठे आहे आणि संबंधित कार्यक्रमाशी त्याचा संबंध काय? हे तपासातून स्पष्ट होऊ शकते. विशेष म्हणजे व्यक्तीगत वाढदिवसाचा कार्यक्रम असेल तर मग त्याचे बिल कसे पेड झाले, त्याचे काही पुरावे तपासले का? असाही सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

**सडेतोड**
जनता आवाज
महेश रक्ताटे
मो. ८८९६७११७११

### राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रश्न

नेवाशात सध्या राजकीय संघर्ष सुरू आहे. विविध प्रकरणांवरून आरोप-प्रत्यारोप होत असताना पोलिस अधिकाऱ्यांची सार्वजनिक कार्यक्रमातील उपस्थिती चर्चेचा विषय बनत आहे. चर्चेत असलेल्या या सत्कार सोहळ्यात नेवाशातील एका गाजलेल्या प्रकरणाशी संबंधित व्यक्ती उपस्थित असल्याचे सांगितले जात आहे. ही बाब खरी असल्यास त्या व्यक्तीची उपस्थिती, कार्यक्रमाचे स्वरूप आणि संबंधित प्रकरणाशी त्याचा काही संबंध आहे का? याची वस्तुनिष्ठ पडताळणी होणे आवश्यक आहे. यातून कोणत्याही व्यक्तीवर दोषारोप होत नाही. मात्र चौकशीच्या निष्पक्षतेबाबत नागरिकांच्या मनात संशय निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने पारदर्शक भूमिका घेणे आवश्यक आहे.

### सायबर तपासाची मागणी

या प्रकरणातील महत्त्वाचा भाग डिजिटल माध्यमाशी संबंधित असल्याने सायबर तज्ज्ञांची मदत घेण्याची मागणी होत आहे. संबंधित व्हिडिओ उपलब्ध असल्यास त्याची डिजिटल सत्यता, अपलोडची तारीख, मूळ स्रोत आणि कार्यक्रमाशी असलेला संबंध तपासता येऊ शकतो. त्यामुळे व्हिडीओ नाही या कारणावर चौकशी थांबविण्यापेक्षा उपलब्ध डिजिटल पुराव्यांची पडताळणी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

### व्हिडीओ कुठे आहे? याचा शोध महत्त्वाचा

डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे एखाद्या कार्यक्रमाचे पुरावे केवळ पत्रकारांच्या मोबाईलमध्येच असतील असे नाही. फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब किंवा अन्य माध्यमांवर संबंधित कार्यक्रमाचे फोटो अथवा व्हिडिओ उपलब्ध असण्याची शक्यता असते. त्यामुळे संबंधित सोशल मीडिया पोस्टची तारीख, मूळ लिंक, पोस्ट करणारे खाते आणि उपलब्ध डिजिटल सामग्रीची पडताळणी करण्याची गरज आहे. व्हिडिओ उपलब्ध नाही, असे सांगण्यापेक्षा तो नेमका कुठे आहे, कधीचा आहे आणि कोणत्या कार्यक्रमाचा आहे, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे ठरू शकते.

### चौकशी नेमकी कुठपर्यंत?

उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांनी चौकशीचे सुरु आहे, असे सांगितले होते. परंतु आतापर्यंत या प्रकरणात कोणती कार्यवाही झाली, कोणाची माहिती घेण्यात आली, कोणते पुरावे तपासण्यात आले आणि कोणते पुरावे उपलब्ध झाले नाहीत, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. हॉटेल व्यवस्थापनाशी संपर्क साधला का? सीसीटीव्ही तपासले का? कार्यक्रमाचे आयोजक अथवा उपस्थित व्यक्तींची माहिती घेतली का? सोशल मीडिया सामग्री तपासली का? सायबर विभागाची मदत घेण्यात आली का? तसेच संबंधित अधिकारी त्यावेळी कर्तव्यावर होते की सुट्टीवर होते, याबाबत त्यांची चौकशी करून दप्तरी काही नोंद करण्यात आली का? या प्रश्नांची उत्तरे मिळणे गरजेचे आहे. चौकशी जाहीर होणे ही सुरुवात, मात्र तिचा निःष्पक्ष निष्कर्ष समोर येणे ही खरी कसोटी आहे.

### आता प्रशासनाने स्पष्ट करावे

संबंधित प्रकरणात व्हिडिओ उपलब्ध नाही, एवढ्यावर चौकशीची दिशा ठरविण्याऐवजी उपलब्ध सर्व संभाव्य पुराव्यांची पडताळणी झाली का? हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. व्हिडिओ नाही म्हणून चौकशीला ब्रेक लागणार, की उपलब्ध डिजिटल आणि प्रत्यक्ष पुराव्यांचा माग काढून सत्य समोर आणले जाणार? या प्रश्नाकडे आता नेवासेकरांचे लक्ष लागले आहे.

**संमिश्र**

### इथेनॉल पेट्रोलमध्ये नव्हे, खड्ड्यांत टाका : आदित्य ठाकरे

**मुंबई :** मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामांवर आणि रस्त्यांच्या दुरवस्थेवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टद्वारे त्यांनी महामार्गाच्या कामांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या कामांवर आणि वारंवार दिल्या जाणाऱ्या आश्वासनांवर सडकून टीका केली. आदित्य ठाकरे यांनी आपल्या पोस्टद्वारे राज्यसरकारवर टीका केली आहे, ते म्हणाले, ''कदाचित या रस्त्यातही इथेनॉल मिसळलं असतं, तर काम लवकर पूर्ण झालं असतं,'' असा टोला लगावला.

### कामगार संघटनांचे जेलभरो आंदोलन

**पुणे :** केंद्र आणि राज्य सरकारने लागू केलेल्या नवीन कामगार कायद्यांविरोधात कामगार संघटना संयुक्त कृती समितीने सोमवारी पिंपरी येथे जेलभरो आंदोलन केले. हे नवीन कायदे कामगारांचे आर्थिक आणि सामाजिक शोषण करणारे असून, ते रद्द करून जुने, परंपरागत कामगार कायदे पुन्हा लागू करावेत, अशी मागणी आंदोलकांनी केली. कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे पुणे जिल्हा अध्यक्ष आणि इंटकचे प्रदेशाध्यक्ष कैलास कदम यांनी सांगितले की, १ जूनपासून लागू झालेले हे चार नवीन कामगार कायदे संघटित आणि असंघटित कामगारांचे शोषण करतील.

### पृथ्वीराज चव्हाण नागपूर न्यायालयात हजर

**नागपूर :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आज नागपूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर झाले. भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची तुलना दहशतवादी विचारसरणीशी करून बदनामी केल्याप्रकरणी त्यांच्यावर मानहानीचा दावा दाखल करण्यात आला आहे. भाजपचे आमदार आणि तत्कालीन नागपूर शहराध्यक्ष प्रवीण दटके यांनी हा दावा दाखल केला आहे. हे प्रकरण २०१८ मधील आहे, जेव्हा नागपुरात विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू होते. त्यावेळी काँग्रेसने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजप आणि आरएसएसवर जोरदार टीका केली होती.




# परदेशींच्या न्यायासाठी नगरकर एकवटले

## अहिल्यानगर शहर बंद; बाजारपेठांमध्ये शुकशुकाट; रस्ते बॅरिकेटने बंद; पोलिसांचा बंदोबस्त

### आरोपींच्या घरावर बुलडोझर चालवा : जगताप

धीरज परदेशी यांच्या मृत्यूनंतर आ. संग्राम जगताप यांनी आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. मुख्य आरोपीला तातडीने अटक करावी, तसेच आरोपीच्या घरावर बुलडोझर चालवून कठोर कारवाई करावी, तसेच धीरज परदेशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मागे हटणार नाही, अशी आक्रमक भूमिका आ. जगताप यांनी घेतली.



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महापालिका कंत्राटी कर्मचारी धीरज कचरुसिंग परदेशी यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याच्या निषेधार्थ अहिल्यानगर शहरात दुसऱ्या दिवशीही कडकडीत बंद पाळण्यात आला. हल्लेखोरांना कठोरात कठोर शिक्षा करावी, या मागणीसाठी बंदची हाक देण्यात आली होती. व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत दुकाने बंद ठेवली. त्यामुळे माळीवाडा, तोफखाना, भिंगार, केडगावसह शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये दिवसभर शुकशुकाट दिसून आला.

बंदमुळे एसटी बस, ऑटो रिक्षा तसेच खासगी वाहतूकही मोठ्या प्रमाणात ठप्प राहिली. शहरातील विविध भागांत नागरिकांनी तसेच व्यापाऱ्यांनी बंदला पाठिंबा दिला. परदेशी यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या हल्लेखोरांवर कठोर कारवाई करून त्यांना कडक शिक्षा द्यावी, तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावीत, (पान ४ वर)

### मुकुंदनगरमध्ये रस्ते बॅरिकेटने बंद

धीरज परदेशी यांच्या पत्नीने, ज्या ठिकाणी त्यांच्या पतीवर हल्ला झाला त्याच कब्रस्तानात अंत्यविधी करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. हिंदुत्ववादी संघटनांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. दरम्यान, परदेशी यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. कुटुंबीय व हिंदुत्ववादी संघटनांनी मुकुंदनगरमध्येच अंत्यविधी करण्याचा इशारा दिल्याने पोलिस प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून मुकुंदनगरकडे जाणारे रस्ते बॅरिकेट लावून बंद केले. परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून पोलीस अधीक्षक स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

### शाळा, महाविद्यालयांनाही बंदचा फटका

धीरज परदेशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ शहरात सलग दुसऱ्या दिवशी बंद पाळण्यात आला. बंदच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून शाळा व महाविद्यालयेही बंद ठेवण्यात आली. पाथर्डी, राहुरी शहरासह अहिल्यानगर शहरातील कापडबाजार, माणिक चौक परिसरातील दुकाने बंद होती. त्यामुळे नेहमी गजबजलेल्या बाजारपेठांमध्ये दिवसभर शांतता दिसून आली.

### मनपा कर्मचाऱ्यांचीही केले निदर्शने

महापालिका कर्मचारी धीरज परदेशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ महापालिका कर्मचारी संघटनेने कामकाज बंद ठेवून महापालिकेसमोर निदर्शने केली. आरोपींना कठोरात कठोर शिक्षा करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. कर्मचाऱ्यांना पुरेसे संरक्षण मिळाल्याशिवाय काम काज सुरु करणार नसल्याचा इशाराही संघटनेने दिला.

# महाराष्ट्राच्या प्रश्नांवर मोदींशी चर्चा : सुळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या ८ खासदारांनी खा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली संसद भवनातील पंतप्रधान कार्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. सुमारे १५ मिनिटे चाललेल्या या बैठकीत राजकीय भाष्य टाळून महाराष्ट्रातील प्रलंबित विकासकामे, शेतकरी प्रश्न आणि मतदारसंघातील कळीच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली, अशी माहिती खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे.

बैठकीच्या सुरुवातीलाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खा. सुप्रिया सुळे (पान ४ वर)



> संसदेचे कामकाज सुरळीत चालत नसल्याने जनतेचे आणि मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न थेट पंतप्रधानांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या भेटीदरम्यान कोणताही राजकीय विषय चर्चेत आला नाही.
>
> **– सुप्रिया सुळे, खासदार**

# शेवगावचा सर्वांगीण विकास हेच ध्येय

## आ. मोनिका राजळे; ७५ लाखांच्या जॉगिंग ट्रॅकचे भूमिपूजन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव शहरातील विविध प्रभागांमध्ये विकासकामांना प्राधान्य देण्यात येत आहे. नागरिकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनस्तरावर आवश्यक तो पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही आ. मोनिका राजळे यांनी दिली.

शहरातील नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक १२ मधील गीता माई नगर, लड्डा कॉलनी, श्रीराम कॉलनी, साईनगर, छत्रपती संभाजीनगर, शंकरनगर, प्रभाकरनगर, हनुमाननगर तसेच विखे पाटील शैक्षणिक संकुलाशेजारी ७५ लाख रुपये खर्चून जॉगिंग ट्रॅक विकसित करण्यात येणार आहे. या कामाचा भूमिपूजन समारंभ आ. राजळे यांच्या हस्ते झाला. यावेळी त्या बोलत होत्या.

प्रभाग क्रमांक १२ मध्ये जॉगिंग ट्रॅकची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक तसेच परिसरातील नागरिकांना व्यायामासाठी हक्काची जागा उपलब्ध होणार आहे. या सुविधेमुळे नागरिकांच्या आरोग्याला चालना मिळण्याबरोबरच परिसराच्या विकासालाही वेग (पान ४ वर)

# देवीभोयरेत व्यासपीठावरच महायुतीत तू-तू, मै-मै!

## श्रेयवादातून सावंत-कोरडे आमनेसामने; अन् आ. दातेंची शेवटची 'वॉर्निंग'



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** तालुक्यातील देवीभोयरे येथे विकासकामांच्या भूमिपूजन आणि लोकार्पणाचा कार्यक्रम होता. व्यासपीठावर होते महायुतीचे नेते आणि कार्यक्रम होता विकासाचा. पण काही वेळातच विकासाचा हा मंच श्रेयवादाच्या आखाड्यात बदलला. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत आणि भाजपचे नेते विश्वनाथ कोरडे यांच्यात अक्षरशः तू-तू, मैं-मैं झाली.

वाद इतका वाढला की, एकमेकांना प्रत्युत्तर देताना तुझं मी ऐकत नाही, दाखव इथेच दाखव आणि बिनडोक अशा शब्दांचा वापर झाला. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण होताच आमदार काशिनाथ दाते यांना हस्तक्षेप करावा लागला. आणि दाते यांनीही दोन्ही नेत्यांना थेट सुनावले ही माझी शेवटची वॉर्निंग आहे!

देवीभोयरे येथे आ. काशिनाथ दाते यांच्या सत्कारासह विविध विकास कामांचे भूमिपूजन (पान ४ वर)

### सावंत-कोरडेंमध्ये संघर्ष कायम

सावंत-कोरडे यांच्यात राजकीय संघर्षाची ठिणगी कायम राहिली. अशोक सावंत यांनी या प्रकाराची तक्रार आपल्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांकडे करणार असल्याचे सांगितले. त्यावर आमदार दाते यांनी ठीक आहे, तुम्हाला जिकडे तक्रार करायची तिकडे तक्रार करा, असे उत्तर दिले. तसेच सावंत यांनी शांततेची भूमिका घ्यावी, अशी विनंतीही आ. दाते यांनी केली.

### आ. दातेंनी दिली वॉर्निंग

आ. दाते यांनी दोन्ही नेत्यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला. इथे मी तुम्हाला वॉर्निंग देतो. ही माझी शेवटची वॉर्निंग आहे. अनेक वेळा झालं, आज जरा जास्त झालं. व्यासपीठावर सावंत आणि कोरडे उपस्थित असताना अनेकदा अशा प्रकारचे वाद होत असल्याचेही दाते यांनी नमूद केले. दाते यांच्या या भूमिकेमुळे वातावरण काहीसे शांत झाले.

# संगमनेरात बनावट दारूचा पर्दाफाश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर शहरात गोवा बनावटीचे तसेच महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेले मद्य बेकायदेशीररीत्या आणून त्याची बनावट निर्मिती व विक्री करणाऱ्या रॅकेटचा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने पर्दाफाश केला. शिवाजीनगर परिसरातील एका घरावर छापा टाकून गोवा बनावटीच्या मद्याचे तब्बल ३४ बॉक्स, विविध नामांकित ब्रँडच्या रिकाम्या बाटल्या, बनावट बुचे आणि वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी दुचाकी असा एकूण ५ लाख (पान ४ वर)

# गरजूंसाठी आरोग्य शिबिरे ठरतात आधारवड

## आ. संग्राम जगताप; फुलसौंदर यांच्या प्रयत्नातून मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नागरिकांमध्ये विविध प्रकारच्या आरोग्य समस्या वाढत असून त्यांना अधिकाधिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. गरजू रुग्णांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी अशा मोफत आरोग्य शिबिरांचे सातत्याने आयोजन होणे आवश्यक आहे. अशा शिबिरांमधून प्राथमिक तपासणी होऊन आजारांचे वेळेत निदान होते व डॉक्टरांना योग्य वेळी उपचार करता येतात, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.




नागरिकांपर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचाव्यात या उद्देशाने अहिल्यानगर महानगरपालिका व साईदीप सह्याद्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सामाजिक कार्यकर्ते ॲड. अवधूत फुलसौंदर यांच्या प्रयत्नातून आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य, रक्त तपासणी व औषधोपचार शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

आ. जगताप म्हणाले की, महिलांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. महिला ही कुटुंबाचा कणा असून तिचे आरोग्य सुदृढ असेल तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहते. थॅलेसेमियासारख्या आजारांमुळे अनेक रुग्णांना नियमित रक्ताची गरज असते. मात्र रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा मोठा तुटवडा जाणवत आहे.

> सण, उत्सव आणि वाढदिवस साजरे करताना प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपत समाजोपयोगी उपक्रम राबविणे आवश्यक आहे. ॲड. अवधूत फुलसौंदर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या मोफत आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने नागरिकांनी लाभ घेतला. सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अशा शिबिरांची आवश्यकता आहे.
> – **भगवान फुलसौंदर**, माजी महापौर

त्यामुळे युवकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्यासाठी पुढे यावे. प्रत्येकाने रक्तदानाचा संकल्प करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास माजी महापौर भगवान फुलसौंदर, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, अविनाश घुले, संजय चोपडा, नगरसेवक प्रकाश भागानगरे, प्रा. माणिक विधाते, दत्ता गाडळकर, मयूर बांगरे, जालिंदर कोतकर, सुनीता फुलसौंदर, मीनाताई चोपडा, बाळासाहेब बारस्कर, अशोक बाबर, महादेव कराळे, जालिंदर बोरुडे, गोरख पडोळे, भाऊसाहेब पांडुळे, सुजित काकडे, अशोक दहिफळे, अलका मुंदडा, गौरव बोरुडे, विष्णू फुलसौंदर, विशाल पवार, प्रदीप बोरुडे, गोरख बोरुडे, अमित घाडगे, सुमित लोंढे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह.भ.प. अमित घाडगे यांनी केले, तर आभार विष्णू फुलसौंदर यांनी मानले.

# शेतकरी कर्जमाफीबद्दल मंत्री विखेंचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** शेतकरी कर्जमाफी केल्याबद्दल पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खर्डे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

कृषक शेतकरी गटाच्या वतीने मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा झाड, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. शेतकरी हिताचा निर्णय घेत कर्जमाफीची घोषणा केल्याबद्दल यावेळी त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींतून बाहेर काढण्यासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करत, कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले. यावेळी कृषक शेतकरी गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.



# लक्ष्मीआईच्या उत्सवाने गुंडेगावात चैतन्य

## लक्ष्मीआईची पोतराजांसह मिरवणूक; गावगाड्याचा नैवेद्य देवीला अर्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वाळकी :** आषाढ महिन्या निमित्त अहिल्यानगर तालुक्यातील गुंडेगाव येथे गावच्या वतीने पारंपरिक लक्ष्मी आई साथीचा उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. भंडाऱ्याची उधळण, पारंपरिक वाद्यांचा गजर, पोतराजांचा सहभाग आणि लक्ष्मी आईच्या नावानं चांगभलंच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

उत्सवातील मिरवणुकीचा शुभारंभ समस्त सकट कुटुंबीयांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आला. त्यानंतर लक्ष्मीमातेच्या उत्सवमूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या निनादात तसेच साईनाथ लोखंडे आणि कोयाळपिंपळा येथील पोतराज लोखंडे यांच्या सहभागाने निघालेल्या या मिरवणुकीने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. भाविकांनी मिरवणुकीदरम्यान भंडाऱ्याची उधळण करत लक्ष्मीमातेचा जयघोष केला.

यावेळी वामनराव जाधव गुरुजी, कारभारी आगळे, बाळासाहेब जाधव पाटील, आनंदराव सकट, कानिफ सकट, आकाश घोडके, परमेश कुसळकर, भरत सोनवणे, गणेश सातपुते, भरत सातपुते, प्रदीप भापकर, अनिल सकट, साहेबराव सकट, महेश ढवळे, दिलीप सकट, अनिल पाचपुते, बाळू सकट, तुषार जाधव, संतोष कोतकर, अविनाश देवकर, अमोल गाडे, सागर जावळे, सुनील देवकर, सोमा दळवी, श्रीकांत आगळे, प्रथमेश पवार, विकास सकट आदींसह युवक, महिला व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या लक्ष्मीआई यात्रेला अनेक पिढ्यांची परंपरा लाभली आहे. धार्मिक परंपरा, लोकसंस्कृती आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविणारा हा उत्सव परिसरातील नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.



### ग्रामस्थांनी लुटला उत्सवाचा आनंद

गावातील पुरुष, महिला आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत उत्सवाचा आनंद लुटला. पारंपरिक वाद्यांच्या गजरामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. मिरवणूक गावातील प्रमुख रस्त्यांवरून मुख्य चौक मार्गे लक्ष्मीमाता मंदिरात पोहोचली. मंदिरात धार्मिक विधी पार पडल्यानंतर गावगाड्याचा नैवेद्य देवीला अर्पण करण्यात आला. आरतीनंतर मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

# हमीभावाला कायदेशीर संरक्षण द्या

## डॉ. अशोक ढगे; खुपटी येथे शेतकरी मेळावा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नसल्याने निर्माण होणाऱ्या आर्थिक अडचणी आणि त्यातून वाढणाऱ्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर शेतमालाला हमीभावाचे कायदेशीर संरक्षण मिळणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन नागपूर कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे यांनी केले.

नेवासा तालुक्यातील खूपटी येथे भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश कारले होते. सरपंच गोरक्षनाथ तनपुरे यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले.

डॉ. ढगे यांनी शेतमालाच्या उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असताना बाजारभाव मात्र अनिश्चित राहत असल्याकडे लक्ष वेधले. शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळण्यासाठी हमीभावाला कायदेशीर आधार मिळणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकरी आत्महत्यांच्या प्रश्नावरही त्यांनी चिंता व्यक्त करत शेती अधिक शाश्वत आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ठोस धोरणांची आवश्यकता असल्याचे सांगितले.

डॉ. रमेश हापसे यांनी ऊस उत्पादन वाढीच्या संदर्भात शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. चांगल्या उत्पादनासाठी बेण्याची योग्य निवड, पाणी व्यवस्थापन, खतांचा संतुलित वापर आणि पिकाच्या वाढीच्या विविध टप्प्यांनुसार नियोजन यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. पारंपरिक पद्धतीसोबत आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रवीण कुऱ्हे यांनी केले. परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



### शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा

मेळाव्यात उपसरपंच किशोर कुऱ्हे, सोसायटीचे चेअरमन प्रकाश कारले, व्हा. चेअरमन सुनील गव्हाणे, तंटामुक्ती अध्यक्ष गोवर्धन गव्हाणे, सोमनाथ काळे, कृषी अधिकारी शेळके पाटील, गोणेगावचे माजी सरपंच प्रकाश रोडे, सोपानराव शिंदे, भाऊसाहेब चौधरी आणि जगदीश चौधरी यांनी शेतीशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित करून चर्चेत सहभाग घेतला.

# पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्या : डॉ. लोखंडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान :** वृक्षारोपण करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करणेही गरजेचे आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षसंवर्धन ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी असून, ती काळाची गरज आहे, असे प्रतिपादन निसर्ग व पर्यावरण मंडळाचे राज्य उपाध्यक्ष तथा माजी मुख्याध्यापक हभप डॉ. अनिल लोखंडे यांनी केले.

टाकळीभान येथील जिल्हा परिषद वस्ती शाळा, दाभाडे वस्ती येथे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. लोखंडे बोलत होते. यावेळी श्रीरामपूर एलआयसी शाखेचे शाखाधिकारी नामदेव कानडे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, अनिल बोडखे, केंद्रप्रमुख वाघ सर आदींनी पर्यावरणाचे महत्त्व विशद करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. टाकळीभान तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष आबासाहेब रणनवरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या हस्ते तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.



कार्यक्रमास टाकळीभानचे सरपंचपती यशवंत रणनवरे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष आबासाहेब रणनवरे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, विलास दाभाडे, प्रा. कार्लस साठे, तंटामुक्ती समितीचे उपाध्यक्ष अनिल दाभाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल दाभाडे, प्रा. जयकर मगर, प्रकाश दाभाडे, मेजर पोपटराव दाभाडे, बंडोपंत बोडखे, भैय्या पठाण, मोहन रणनवरे, प्रताप लोखंडे आदींसह ग्रामस्थ, पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन पर्यावरण मंडळाचे जिल्हा संघटक अर्जुन राऊत व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल दाभाडे यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन अर्जुन राऊत यांनी केले, तर आभार मुख्याध्यापिका अवचट यांनी मानले.

# पेन्शनर्सचा लढा सुरूच राहणार : राऊत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** सार्वजनिक, सहकारी, महामंडळे तसेच खासगी क्षेत्रातील ईपीएस-९५ योजनेतील निवृत्त कर्मचारी गेल्या दहा वर्षांपासून पेन्शनवाढीसाठी संघर्ष करीत आहेत. मात्र, शासनाकडून केवळ आश्वासनांपलीकडे ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे यापुढे रस्ता रोको, चक्का जाम, आमरण उपोषण, ताळा ठोको आदी विविध आंदोलनांच्या माध्यमातून हा लढा अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रीय संघर्ष समितीचे अध्यक्ष कॅप्टन अशोक राऊत यांनी दिला.

नवी दिल्ली येथील जंतरमंतर मैदानावर ईपीएस-९५ योजनेतील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कॅप्टन अशोक राऊत यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात देशभरातील सार्वजनिक व सहकारी क्षेत्रातील साखर कारखाने, सूतगिरण्या, बँका, दूध संघ, शेती महामंडळ, एस.टी. महामंडळ, एमएसईबी, एमआयडीसी, मुळा-प्रवरा वीज संस्था आदी संस्थांमधील निवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान, जंतरमंतर मैदानावरील आंदोलनस्थळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, खासदार श्रीरंग बारणे आणि खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी भेट देऊन पेन्शनर्सच्या मागण्यांबाबत चर्चा केली. पेन्शनर्सच्या लढ्याबाबत आणि त्यांच्या मागण्यांबाबत सुरुवातीपासूनच सकारात्मक भूमिका घेतली आहे. यापुढेही ही भूमिका कायम ठेवून हा प्रश्न संसदेत तसेच मंत्रीस्तरावर मांडून त्याचा पाठपुरावा केला जाईल. संसदेत या प्रश्नावर मुद्दा उपस्थित करूनही त्याची अपेक्षित दखल घेतली गेली नाही, याबद्दल खंत आहे. मात्र, पेन्शनर्सचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत सक्रियपणे पाठपुरावा केला जाईल, असे खा. भाऊसाहेब वाकचौरे म्हणाले.

# औद्योगिक स्वयंचलितीकरणाचे विद्यार्थ्यांना धडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** समर्थ शैक्षणिक संकुलातील समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या वतीने औद्योगिक स्वयंचलितीकरण व एम्बेडेड प्रणाली या विषयावर मार्गदर्शनपर सेमिनार आयोजित करण्यात आला. यावेळी उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने महाविद्यालय आणि प्रोलिफिक सिस्टिम अँड टेक्नॉलॉजीज प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

या सेमिनारमध्ये पुणे येथील प्रोलिफिक सिस्टिम अँड टेक्नॉलॉजीज कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक विवेक विष्णू सरदळ यांनी विद्यार्थ्यांना औद्योगिक ऑटोमेशन, एम्बेडेड सिस्टिम्स, आधुनिक तंत्रज्ञानातील बदल, उद्योगक्षेत्रातील सध्याचे प्रवाह तसेच त्यांचे प्रत्यक्ष उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध करिअरच्या संधी, उद्योगांच्या बदलत्या गरजा आणि विद्यार्थ्यांनी आत्मसात करावयाच्या तांत्रिक कौशल्यांची माहितीही त्यांनी दिली. या उपक्रमाबद्दल समर्थ शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य स्नेहलताई शेळके आणि कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत यांनी आयोजक तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभाग प्रमुख प्रा. निर्मल कोठारी यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. डिपार्टमेंट ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. दिपाली गडगे यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. प्रा. सुचिता गडगे यांनी सूत्रसंचालन केले व उपस्थितांचे आभार मानले.



### औद्योगिक कौशल्यवृद्धीसाठी सामंजस्य करार

# पंचायत समितीसमोर अपघातांचा धोका

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील पाथर्डी पंचायत समितीसमोरील परिसरात सातत्याने अपघात होत असल्याने या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. याबाबत राष्ट्रीय महामार्ग उपविभागाच्या उपविभागीय अभियंत्यांना निवेदन देण्यात आले आहे.

गुरुवार (दि. २३ जुलै) रोजी सार्वजनिक बांधकाम विभागातील निवृत्त कर्मचाऱ्याचा या परिसरात अपघातात मृत्यू झाल्याने महामार्गावरील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रा. सुनील पाखरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

राष्ट्रीय महामार्गालगत न्यायालय, पंचायत समिती, तहसील कार्यालय, पशुवैद्यकीय दवाखाना, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यालय, प्रांत अधिकाऱ्यांचे निवासस्थान, ज्योती भवन रुग्णालय, बाबूजी आव्हाड महाविद्यालय, आनंद कॉलेज, श्री तिलोक जैन महाविद्यालय, ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, काकडे बोर्डिंग, पार्थ पब्लिक स्कूल आणि धान्य गोदाम आदी महत्त्वाची शासकीय व शैक्षणिक ठिकाणे आहेत. त्यामुळे या मार्गावर दररोज हजारो नागरिक व विद्यार्थी ये-जा करतात. या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसविण्यासोबतच वाहतुकीचे योग्य नियोजन करावे, प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक त्या सुरक्षितता उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनावर प्रा. सुनील पाखरे, आसिफ गणिभाई शेख, युसुफ गणिभाई शेख, नागनाथ गर्जे आणि अर्जुन गीते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती राष्ट्रीय महामार्ग विभाग, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, परिवहन अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच पाथर्डी पोलीस निरीक्षक यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# आदिवासी नृत्याने संगमनेर शहर दुमदुमले

## आदिवासी बांधवांच्या मिरवणुकीत आ. अमोल खताळांचा उत्स्फूर्त सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** जागतिक आदिवासी दिनानिमित्त संगमनेर शहरात आदिवासी बांधवांच्या वतीने मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आदिवासी बांधवांसमवेत आ. अमोल खताळ यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यांचा गजर, आदिवासी नृत्य आणि जोरदार घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले होते. विविध पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या आदिवासी बांधवांमुळे शहरातील वातावरण आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगून गेले होते.



शहरातील छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बसस्थानक मार्गे नवीन अकोले रोड, बायपास, अकोले रोडमार्गे मिरवणूक मातोश्री लॉन्स येथे पोहोचली. तेथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

मिरवणुकीदरम्यान आदिवासी समाजाच्या समृद्ध परंपरा, संस्कृती, कला आणि लोकजीवनाचे दर्शन घडले. पारंपरिक नृत्य आणि वाद्यांच्या तालावर तरुणाईसह महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. मिरवणुकीत सहभागी होऊन आदिवासी बांधव-भगिनींसोबत जागतिक आदिवासी दिनाचा आनंद आणि अभिमान साजरा करण्यात आला.

यावेळी आदिवासी समाजाने जल, जंगल आणि जमिनीच्या रक्षणासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. तसेच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी क्रांतीवीरांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेलाही उजाळा देण्यात आला. ब्रिटिश सत्तेविरोधात संघर्ष करताना अनेक आदिवासी क्रांतीवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या शौर्य, त्याग आणि बलिदानामुळे स्वातंत्र्यलढ्याला मोठे बळ मिळाले. अशा तमाम आदिवासी क्रांतीवीरांना यावेळी विनम्र अभिवादन करण्यात आले.

आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन करणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शिक्षण, रोजगार, आरोग्य, मूलभूत सुविधा तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ आदिवासी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही करण्यात आले.

> आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्य, मूलभूत सुविधा आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. आदिवासी बांधवांच्या हक्कांचे संरक्षण करत त्यांच्या विकासाला अधिक गती देणे हीच क्रांतीवीरांना खरी आदरांजली ठरेल.
> – **अमोल खताळ, आमदार**

# सावता महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**भेंडा** : नेवासा तालुक्यातील भेंडा येथील जेऊर रोड वरील फुलारी वस्ती येथे बांधण्यात आलेल्या श्रीसंत शिरोमणी सावता महाराज मंदिराचे दि.१५ ते १७ ऑगस्ट या कालावधीत श्रीसंत शिरोमणी सावता महाराज मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा व त्रिदिनात्मक किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि.११ ऑगस्ट रोजी सकाळी ८:३० वाजता भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांचे शुभहस्ते या कार्यक्रमाचे धर्मध्वजारोहण होणार आहे.

श्रीक्षेत्र देवगड संस्थानचे प्रमुख गुरुवर्य महंत भास्करगिरीजी महाराज यांचे मार्गदर्शनाने व श्रीक्षेत्र आळंदी येथील ज्ञानाई आश्रमाच्या प्रमुख गुरुवर्य मिराबाई महाराज मिरीकर, श्रीसंत शिरोमणी सावता महाराजांचे वशंज रविकांत महाराज वसेकर यांच्या आशिर्वादाने श्रीसंत शिरोमणी सावता महाराज मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होत आहे.

यानिमित्त शनिवार दि.१५ रोजी दुपारी २ वाजता नागेबाबा मंदिर ते सावता मळा अशी सावता महाराज मुर्तीची भव्य मिरवणूक व श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे विश्वस्त वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांची सदिच्छा भेट,सायंकाली ७ ते ९ अंकुश महाराज कादे यांचे कीर्तन होईल.

रविवार दि.१६ रोजी सकाळी १० वाजता महंत सुनिलगिरिजी महाराज यांची सदिच्छा भेट व सायंकाली ७ ते ९ रमेश महाराज वसेकर यांचे कीर्तन होईल. सोमवार दि.१७ रोजी सकाळी ८ वाजता श्रीक्षेत्र देवगड संस्थानचे प्रमुख गुरुवर्य महंत भास्करगिरीजी महाराज यांचे हस्ते श्रीसंत शिरोमणी सावता महाराज मंदिराचे कलशारोहण व मूर्ती प्राणप्रतिष्ठापणा होवून सकाळी ९ ते ११ श्रीक्षेत्र देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांचे कल्याचे कीर्तन होईल.कीर्तन सेवेनंतर भाविकांसाठी महाप्रसाद होईल.

# क्रांती दिनाचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मोठे महत्त्व

## काँग्रेस नेते थोरात; लोकशाही विरुद्धच्या विघातक शक्तींच्या विरोधात तरुणाई सक्रिय



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली ९ ऑगस्ट क्रांती दिन 'चले जाओ' चे मोठे आंदोलन झाले. देश स्वातंत्र्यासाठी अनेक वीरांनी हुतात्मे पत्करले. त्यांच्या त्यागातून देशाला स्वातंत्र्य मिळाले. राज्यघटना आली. मात्र ज्या विचारांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये कोणतेही योगदान दिले नाही. इंग्रजांविरुद्ध कोणतीही लढाई केली नाही. ते लोक आज जातीभेदाच्या नावावर दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहे. देश, लोकशाही आणि राज्यघटना वाचवण्याची याकरता या लोकशाही विरुद्धच्या विघातक शक्तींविरोधात देशातील तरुणाई सज्ज झाली असून या दिनाचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मोठे महत्त्व असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा प्रांताध्यक्ष बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

नेहरू चौक येथील अशोक स्तंभास क्रांती दिना निमित्त अभिवादन केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी माजी आ. डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, डॉ. जयश्री थोरात, सोमेश्वर दिवटे, अजय फटांगरे, हिरालाल पगडाल, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, प्रा.बाबा खरात, गजेंद्र नाकील, नितीन अभंग, राणी प्रसाद मुंदडा किशोर टोकसे, जीवन पांचारिया उपस्थित होते.

थोरात म्हणाले की, ९ ऑगस्ट क्रांती दिन हा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत छोडो हे आंदोलन या दिवशी सुरू झाले. संपूर्ण देश पेटून उठला. नंदुरबारचा अकरा वर्षाचा शिरीष कुमार देशाचा झेंडा घेऊन निघाला. यावेळी त्याच्यावर ब्रिटिशांनी गोळ्या घातल्या. अनेक क्रांतिवीर, देशभक्त यांच्या त्यागातून आणि बलिदानातून भारताला स्वातंत्र्य मिळाले.

स्वातंत्र्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात राज्यघटना मिळाली गरिबाला मताचा अधिकार आला. मात्र सध्या देशांमध्ये जातीयवादी शक्ती दिशाभूल करत आहे. ज्या शक्तींनी कधीही स्वातंत्र्य लढ्यामध्ये भाग घेतला नाही. इंग्रजांविरुद्ध कोणतीही लढाई केली नाही. यांच्यापैकी कोणीही तुरुंगात गेले नाही. आज मात्र दुर्दैवाने ती लोक जातीभेदाच्या नावावर राजकारण करत आहे. देशाची दिशाभूल करत आहे.

> माजी आ. डॉ. तांबे म्हणाले की, काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीच्या बैठकी मध्ये ८ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलनाची दिशा ठरली त्याच रात्री सर्व राष्ट्रपुरुषांना अहमदनगरच्या किल्ल्यामध्ये कैद करण्यात आले. जनता पेटून उठली. चले जाव ही मोठी लोकचळवळ उभी राहिली. स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. आणि त्यामधून हे स्वातंत्र्य मिळाले.मात्र हे स्वातंत्र्य आणि लोकशाही सध्या धोक्यामध्ये आली असून ही लोकशाही सुरक्षित ठेवण्यासाठी आता सर्वांनी एकजुटीने लढावे असे आवाहन त्यांनी केले.

# श्रावणात शनिमूर्तीवर जलाभिषेकाची सुविधा

## इतर भाविकांसाठी चौथऱ्याखालून नियमित दर्शन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : पवित्र श्रावण महिन्याच्या निमित्ताने श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर यांच्या वतीने शिंगणापूर व पंचक्रोशीतील स्थानिक भाविकांच्या प्रथा व परंपरेनुसार श्री स्वयंभू शनिदेव महाराजांच्या दर्शन व जलाभिषेकाचे नियोजन करण्यात आले असून दि. १३ ऑगस्ट ते दि. ११ सप्टेंबर या श्रावण मासाच्या कालावधीत शिंगणापूर व पंचक्रोशीतील स्थानिक भाविकांना दररोज पहाटे ५.०० ते सकाळी ७.०० वाजेपर्यंत चौथऱ्यावर जाऊन श्री स्वयंभू शनिदेव महाराजांच्या मूर्तीस जलाभिषेक करता येणार असल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले आहे.

स्थानिक भाविकांनी देवस्थान विश्वस्तव्यवस्थेने उपलब्ध करून दिलेल्या सुविधेच्या ठिकाणी स्नान करून, ओल्या वस्त्राने जलाभिषेकासाठी निर्धारित केलेल्या जलपात्रातून पाणी घेऊन चौथऱ्यावर जावे व श्री शनिदेव महाराजांच्या मूर्तीस जलाभिषेक करावा. ही सुविधा केवळ निर्धारित वेळेतच उपलब्ध राहणार आहे.

तसेच शिंगणापूर व पंचक्रोशीबाहेरील तसेच कोरड्या वस्त्रातील इतर सर्व भाविकांसाठी चौथऱ्याखालील नियमित दर्शन व्यवस्था पूर्वीप्रमाणेच सुरू राहणार असून अशा भाविकांना नियमित दर्शन मार्गावरून श्री शनि मुर्तीचे दर्शन घेता येईल. श्रावण मासात भाविकांची मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी लक्षात घेता, भाविकांची सुरक्षितता, दर्शन व्यवस्था, गर्दीचे योग्य नियोजन तसेच स्थानिक प्रथा व परंपरांचे पालन यासाठी सदर व्यवस्था करण्यात आली असल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# पोलीस अधीक्षकांकडून विविध भागांची पाहणी

## कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सूचना



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर महानगरपालिकेतील कर्मचारी धीरज परदेशी यांच्या मृत्यू प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारीच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमका यांनी शहरातील विविध संवेदनशील भागांची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमका यांनी शहरातील प्रमुख चौक, संवेदनशील भाग, बाजारपेठ परिसराची पाहणी करून तेथील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून परिस्थितीची माहिती घेतली.शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढविणे, संवेदनशील भागात गस्त वाढविणे, नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारची अफवा पसरू न देणे तसेच परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवणे, अशा विविध सूचना पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. कोणत्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचणार नाही, यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना पोलीस अधीक्षकांनी दिल्या.

# बेलापूरला संत सावता महाराज पुण्यतिथी सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर** : संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बेलापूर येथील संत सावता महाराज मंडळ आयोजित सप्ताहाची आज मंगळवार (दि. ११) रोजी सांगता आणि संत सावता महाराज पुण्यतिथी सोहळा सपन्न होणार आहे.

बेलापूर येथे संत शिरोमणी सावता महाराज यांचे पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी सप्ताहाचे आयोजन केले जाते. सप्ताहात ग्रन्थराज ज्ञानेश्वरी पारायण, भजन, अन्नदान तसेच हरिपाठ आणि कीर्तनसेवा केली जाते. या सप्ताहाची आज मंगळवार दि. ११ ऑगस्ट रोजी दुपारी १२वा. काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे.सदरचा संत सावता महाराज पुण्यतिथी सोहळा बेलापूर येथील अरुणकुमार वैद्य पथवरील संत सावता महाराज मंदिरात सपन्न होणार आहे. सकाळी १० वाजता मिरवणूक आणि त्यानंतर कीर्तनसेवा, जीवनगौरव,समजभूषण आदि पुरस्कारांचा वितरण समारंभ होऊन महाप्रसादाने सप्ताहाची समाप्ती होणार आहे. याप्रसंगी बेलापूर –ऐनतपूर व पंचक्रोशीतील भाविक तसेच नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संत सावता महाराज मंडळ, बेलपूर बु यांचेवतीने करण्यात आले आहे.

# पोलिस भरतीचे आमिष दाखवून तरुणीचा छळ

## सिक्युरिटी गार्ड गजाआड; अत्याचार केल्याचा आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदे** : माझ्याकडे पोलिस मित्र म्हणून काम कर, त्याचे दहा गुण मिळतील. त्यातून तुला पोलिस भरती करून देतो, असे आमिष दाखवून २० वर्षीय तरुणीशी जवळीक साधत धमकावून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी कर्जत पोलिसांनी श्रीगोंदे शहरातील एका महाविद्यालयात सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करणाऱ्या तरुणाला अटक केली.

भरत रावसाहेब चिंधे (रा. वडगाव तनपुरा, ता. कर्जत) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, पीडित तरुणीला पोलिस होण्याची इच्छा असून, आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने ती पोलिस मित्र म्हणून काम मिळविण्यासाठी आरोपीच्या संपर्कात आली होती. त्यावेळी चिंधे याने पोलिस मित्राचे काम केल्यास भरतीसाठी दहा गुण व अनुभवाचे प्रमाणपत्र मिळेल, असे सांगून तिला नोकरी व पोलिस भरतीचे आमिष दाखवले.

त्यानंतर आरोपीने जवळीक साधून दमदाटी तसेच जीवे मारण्याची धमकी देत वारंवार अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. आरोपीचा मुलगा समर्थ भरत शिंदे यानेही धमकावल्याचा आरोप तरुणीने केला आहे. या प्रकाराची माहिती कोणाला दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याने ती घाबरून गप्प राहिल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

# स्मशानभूमीचा चेंडू प्रशासनाच्या कोर्टात

## बोधेगावातील एका गटाचे उपोषण; दुसऱ्या गटाचे निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बोधेगाव** : शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील गट क्रमांक १६ मधील मातंग समाजाच्या स्मशानभूमीवर अतिक्रमण केल्याचा आरोप करीत सोमवारी (दि. ३) एका गटाने उपोषण केले.

स्मशानभूमीची जागा व गट क्रमांक १४७ मधील जागेचा कोणताही संबंध नसताना मातंग समाजाच्या काही व्यक्ती समाजाचे नाव वापरून उपोषण व खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचा आरोप करीत संबंधितांवर कारवाईच्या मागणीसाठी बुधवारी (दि. ५) तहसीलदार व पोलिसांना दुसऱ्या गटाने निवेदन दिले.

त्यामुळे स्मशानभूमीच्या वादाचा चेंडू आता प्रशासनाच्या कोर्टात गेल्याचे दिसते. बोधेगाव येथील मातंग समाजाच्या स्मशानभूमीवरील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी सोमवारी प्रमोद मिसाळ व भगवान मिसाळ यांनी उपोषण केले. मातंग समाजाच्या दुसऱ्या गटातील समाज बांधवांनी लहुजी सेनेचे अध्यक्ष बन्सीभाऊ मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी तहसीलदार व पोलिस निरीक्षकांना निवेदन दिले.

निवेदनावर लहुजी सेनेचे अध्यक्ष बन्सीभाऊ मिसाळ, नवनाथ मिसाळ, संदीप मिसाळ, अंबादास मिसाळ, संदीप घोरपडे, संतोष मिसाळ, कृष्णा मिसाळ, सुनील लोंढे, गणेश आरे, दीपक आडगळे, दत्तू मिसाळ, विशाल मिसाळ, सोमनाथ मिसाळ आदींच्या सह्या आहेत.

# 'स्वच्छता वारी माऊलींच्या दारी' उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**हंडीनिमगाव** : नेवासा येथे यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने श्री स्वच्छता वारी माऊलींच्या दारी उपक्रम या उपक्रमाद्वारे संत तुकाराम महाराज मंदिर ते ज्ञानेश्वर मंदिर परिसरात माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष युवा नेते उदयन गडाख यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकादशी नंतर मंदिर परिसर स्वच्छ रहावा या हेतूने यशवंत सामाजिक प्रतिष्ठान सोनईच्या वतीने माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष उदयन गडाख यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी संत तुकाराम महाराज मंदिर ते ज्ञानेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवली जाते. यावेळी झालेल्या स्वच्छता अभियान प्रसंगी देवस्थानचे विश्वस्त कैलास जाधव, नगरसेवक जितेंद्र कुऱ्हे, दिनेश व्यवहारे, जालिंदर गवळी, स्वप्नील मापारी आशिष कावरे, रामकीसन कांगुणे, पत्रकार सुधीर चव्हाण, रणजित जाधव, उदय पालवे, डॉ संपत खोसे, योगेश रासने,डॉ विनायक देशमुख उपस्थित होते.

# 'संजीवनी'च्या विद्यार्थ्यांची काकडी विमानतळाला भेट

## विमान पाहण्याच्या कुतूहलापासून पायलट होण्याच्या स्वप्नापर्यंत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : विमान पहिल्यांदाच अगदी जवळून पाहण्याचे कुतूहल घेऊन काकडी येथील श्री साईबाबा इंटरनॅशनल एअरपोर्टवर पोहोचलेले संजीवनी सैनिकी स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी विमानतळाची कार्यप्रणाली, सुरक्षा व्यवस्था, तांत्रिक यंत्रणा आणि विविध विभागांच्या कामकाजाची माहिती घेत परतले. मात्र परतीच्या प्रवासात त्यांच्या डोळ्यांत केवळ विमान पाहिल्याचा आनंद नव्हता, तर पायलट होण्याचे स्वप्नही होते. कुतूहलाचे ध्येयात झालेले हे रूपांतर या शैक्षणिक भेटीचे विशेष आकर्षण ठरले.

संजीवनी सैनिकी स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा नुकताच २६वा स्थापना दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, सामाजिक जाणीव, व्यवहारज्ञान तसेच विविध क्षेत्रांची प्रत्यक्ष ओळख व्हावी, या उद्देशाने संस्थेच्या वतीने अनुभवाधारित उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी श्री साईबाबा इंटरनॅशनल एअरपोर्ट, शिर्डी येथे शैक्षणिक भेट दिली. संस्थेचे ट्रस्टी सुमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्राचार्य के. एल. दरेकर व कॅम्पस प्रशासक विजय भास्कर यांच्या नेतृत्वाखाली एकूण ९८ विद्यार्थी व स्टाफ या भेटीत सहभागी झाले.

विमानतळाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना विमानतळाची संपूर्ण कार्यप्रणाली समजावून सांगितली. विमानांचे आगमन व प्रस्थान, प्रवाशांची सुरक्षा तपासणी, विमानतळावरील सुरक्षा व्यवस्था, विविध तांत्रिक यंत्रणा व मशिनरी तसेच विविध विभागांमध्ये कार्यरत अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. विशेष म्हणजे, दिल्लीहून शिर्डीला आलेले विमान प्रत्यक्ष धावपट्टीवर उतरताना पाहण्याचा रोमांचक अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला.

### प्रत्यक्ष अनुभवातून मोठी स्वप्ने

सुमित दादा कोल्हे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकातील ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून जग समजून घेतले पाहिजे. त्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत. यासाठी संस्थेचे अध्यक्ष नितीन दादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित दादा कोल्हे यांच्या पाठिंब्याने संजीवनीमध्ये अशा अनुभवाधारित उपक्रमांना विशेष महत्त्व दिले जाते.''

# मटका अड्ड्यांवर पोलिसांचा छापा

## पाथर्डीत एकाचवेळी पाच ठिकाणी कारवाई



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी तालुक्यात सुरू असलेल्या अवैध मटका धंद्याविरोधात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धडक कारवाई केली. पाथर्डी शहरातील चार वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून मटका घेणाऱ्या अनेकांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत रोख रकमेसह मोबाईल फोन, दोन दुचाकी व एक चारचाकी वाहन असा सुमारे ५ लाख १८ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. माणिकदौंडी चौक येथे पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमध्ये कल्याण मटका खेळविला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी अतुफ खलील शेख (३२) व अवेज जावेद शेख (२७), दोघे रा. माळी बाभुळगाव, ता. पाथर्डी, यांना ताब्यात घेण्यात आले.चिंचपूर रोडवरील मराठी शाळेसमोर टीव्हीएस व्हेगो दुचाकीवरून मटका घेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सायंकाळी सुमारे ४.३५ वाजता छापा टाकण्यात आला. यावेळी अतिक अब्दुलवहाब शेख (३७), रा. चिंचपूर रोड, कुंभारभट्टी, पाथर्डी, याला ताब्यात घेण्यात आले.आखार भागातील सन टेलरजवळ पत्र्याच्या शेडसमोर मटका घेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. यावेळी मनोज बाळू भागवत (२६), रा. आखार भाग, पाथर्डी, याला ताब्यात घेण्यात आले.

होंडा शाईन दुचाकीवरून मटका घेत असल्याची माहिती मिळाल्याने सायंकाळी ५.३५ वाजता कारवाई करण्यात आली. यावेळी अविनाश बाबासाहेब पाचारणे (३१), रा. कजबा पेठ, पाथर्डी, याला ताब्यात घेण्यात आले.

कोरडगाव रोडवरील सोसायटी पेट्रोल पंपासमोर सायंकाळी करण्यात आलेल्या कारवाईत विजय राम खोले (५९), रा. इंदिरानगर, पाथर्डी, याच्याकडून रोख रक्कम व मटका खेळण्याचे साहित्य जप्त करण्यात आले. विजय खोले हा कोणासाठी मटका घेत होता त्याचा शोध पोलीस घेत आहे. या सर्व प्रकरणांत महाराष्ट्र जुगारबंदी कायदा कलम १२(अ) अन्वये पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## संपादकीय

# आंदोलन काय साधणार?

गेल्या काही वर्षांमध्ये केंद्र सरकारला पाठिंबा देणारा आणि भाजपचा सामाजिक आधार मानला जाणारा तरुणवर्ग दिल्लीमधील कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाच्या निमित्ताने प्रथमच मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरल्याचे चित्र सरत्या आठवड्यामध्ये दिसले. हा बदल केवळ राजकीय नाही, तर सामाजिक मानसशास्त्रातील बदलाचाही संकेत आहे. रोजगार, शिक्षण, स्पर्धा परीक्षा, महागाई आणि भविष्याबद्दलची वाढती अनिश्चितता यामुळे तरुणांमध्ये आधीपासूनच अस्वस्थता होती. या आंदोलनाने त्या अस्वस्थतेला संघटित अभिव्यक्ती मिळवून दिली. विशेषतः 'नीट' परीक्षेच्या नियोजनातील त्रुटी, परीक्षा व्यवस्थापनातील गोंधळ आणि पारदर्शकतेवर उपस्थित झालेले प्रश्न यामुळे युवकांमध्ये सरकारविरोधी भावना अधिक तीव्र झाल्या. स्पर्धा परीक्षांसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना परीक्षा व्यवस्थेतील प्रत्येक चूक ही त्यांच्या भविष्याशी केलेली खेळी वाटते. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक त्रुटी आता केवळ प्रशासकीय प्रश्न राहत नाही, तर राजकीय प्रश्नातही रूपांतरित होत आहे. सरकारने या असंतोषाची तीव्रता वेळेवर न ओळखल्यास दीर्घकालीन परिणाम दिसू शकतात. कोणत्याही आंदोलनाची खरी ताकद ही एका व्यक्तीच्या त्यागात नसून जनसहभागात असते. आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय म्हणजे हा संघर्ष आता संघटित स्वरूपात पुढे नेण्याचा प्रयत्न आहे; मात्र प्रश्न असा आहे की या आंदोलनातून प्रत्यक्षात काय साध्य झाले? ताज्या आंदोलनामुळे सरकारला संवादाचे महत्त्व पुन्हा एकदा मान्य करावे लागले. त्यामुळे संबंधित प्रश्न राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले. आता युवकांच्या असंतोषाकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही सरकारला परवडणारे नाही, हा संदेश स्पष्ट झाला. याखेरीज सरकारच्या निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकतेची मागणी अधिक ठळकपणे पुढे आली. या आंदोलनाचा राजकीय पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांनी या मुद्द्यावर सरकारची कोंडी केली. आंदोलनातील घटनांचा आधार घेत सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. विरोधी पक्षांसाठी हे आंदोलन राजकीय संधी घेऊन आले. गेल्या काही वर्षांमध्ये राष्ट्रीय पातळीवर सत्ताधारी पक्षाच्या तुलनेत विरोधकांचा प्रभाव मर्यादित असल्याची टीका होत होती. अशा वेळी युवकांचा असंतोष, परीक्षा व्यवस्थेवरील प्रश्न आणि पोलिस कारवाई यांसारखे मुद्दे विरोधकांसाठी प्रभावी राजकीय शस्त्र ठरू शकतात. सरकारविरोधी वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी या आंदोलनाचा वापर करण्याचा प्रयत्न केला, हे स्पष्ट दिसून आले. अर्थात, केवळ आंदोलनाच्या माध्यमातून विरोधकांना कायमस्वरूपी राजकीय लाभ मिळेल, असे नाही. त्यासाठी पर्यायी धोरणे, विश्वासार्ह नेतृत्व आणि जनतेसमोर ठोस कार्यक्रम मांडावा लागेल. प्रत्येक आंदोलनामागे काही राजकीय शक्ती सक्रिय असू शकतात; पण त्यामुळे आंदोलनातील मूळ प्रश्न नाकारता येत नाहीत. लोकशाहीमध्ये असंतोषाला केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न मानण्याची प्रवृत्ती वाढल्यास संवादाची जागा संघर्ष घेऊ लागतो. ही स्थिती कोणत्याही सरकारसाठी हितावह नसते. या आंदोलनाने आणखी एक महत्त्वाचा संदेश दिला. तो म्हणजे आजचा तरुण कोणत्याही एका राजकीय विचारसरणीशी कायमस्वरूपी बांधील राहिलेला नाही. रोजगार, शिक्षण, संधी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या प्रश्नांवर तो सरकारचे समर्थनही करतो आणि विरोधही. त्यामुळे निवडणुकांमध्ये तरुणांचा पाठिंबा मिळवण्यासाठी केवळ भावनिक मुद्दे पुरेसे राहणार नाहीत. त्यांच्या जीवनाशी संबंधित प्रश्नांवर ठोस काम करावे लागेल. सामाजिक कार्यकर्त्यांच्या आंदोलनाचे राजकीय परिणाम होत असतात आणि राजकीय आंदोलनांना सामाजिक आधार मिळत असतो. या दोन्हींच्या सीमारेषा अनेकदा धूसर होतात. त्यामुळे आंदोलनाचे मूल्यमापन करताना त्यातून कोणाला राजकीय फायदा झाला, या निकषावर निर्णय घेता येत नाही. या आंदोलनाने समाजातील असंतोष, युवकांची चिंता, प्रशासनातील त्रुटी आणि लोकशाहीतील संवादाचे महत्त्व या सर्व मुद्द्यांना राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले, हेच त्याचे सर्वात मोठे यश मानावे लागेल.

सत्ताधाऱ्यांनी या आंदोलनाकडे केवळ राजकीय आव्हान म्हणून न पाहता जनभावनांचा इशारा म्हणून पाहिल्यास सकारात्मक बदल घडू शकतात. अन्यथा, प्रत्येक नवीन आंदोलन हे केवळ एका प्रश्नाचे उत्तर मागणार नाही, तर सरकारच्या संवेदनशीलतेची आणि लोकशाहीवरील विश्वासाचीही परीक्षा घेईल. लोकशाहीमध्ये आंदोलन हा केवळ विरोधाचा मार्ग नसतो, तर सत्ताधाऱ्यांसाठी समाजाच्या मनातील अस्वस्थतेचा आरसा असतो. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी केलेल्या उपोषणाने आणि त्यानंतर दिल्लीमध्ये उभ्या राहिलेल्या व्यापक आंदोलनाने हाच संदेश पुन्हा एकदा अधोरेखित केला. हा संघर्ष एखाद्या व्यक्तीपुरता किंवा एका मागणीपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो आता व्यापक सामाजिक आणि राजकीय चर्चेचा विषय बनला आहे. लडाखच्या नाजूक पर्यावरणाचे रक्षण, स्थानिक जनतेचे लोकशाही हक्क आणि संविधानाच्या सहाव्या अनुसूचीची अंमलबजावणी या मागण्यांवरून पेटलेली ही ठिणगी आता केंद्र सरकारच्या प्रशासकीय संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत आहे. अलिकडच्या काळात राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षा (नीट-यूजी) आणि इतर स्पर्धा परीक्षांच्या नियोजनातील गंभीर त्रुटी, प्रश्नपत्रिका फुटीची प्रकरणे आणि राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या (एनटीए) कारभारातील पारदर्शकतेवर मोठे प्रश्न उपस्थित झाले होते. स्पर्धा परीक्षांसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचाराने खेळ मांडला होता. त्यामुळे शिक्षणव्यवस्थेतील प्रत्येक त्रुटी आता केवळ प्रशासकीय प्रश्न राहिलेली नाही, तर थेट राजकीय प्रश्नात रूपांतरित झाली आहे. वांगचुक यांनी उपस्थित केलेले बेरोजगारी, स्थानिक संसाधनांचे रक्षण आणि प्रशासकीय अपयशाचे मुद्दे देशभरातील विद्यार्थ्यांच्या वेदनेशी थेट जोडले गेले. 'नीट' परीक्षेतील गोंधळामुळे निर्माण झालेली अस्वस्थता आणि लडाखचे आंदोलन यांचा संगम झाल्याने केंद्र सरकारविरोधात एक व्यापक असंतोषाचे वातावरण तयार झाले आहे. ते निवळावे यासाठी सरकार कोणती सकारात्मक पावले उचलते ते आता पहायचे.

# विवाह जुळवणे झाले आव्हान

**विशेष लेख**
**सोमनाथ कचरे, नेवासा**

शिक्षण वाढले, करिअरच्या संधी वाढल्या, आर्थिक स्वावलंबन आले; मात्र योग्य जीवनसाथी शोधण्याचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीचा होत आहे. वाढलेल्या अपेक्षा, बदलती जीवनशैली, आर्थिक-सामाजिक निकष, योग्य स्थळाची कमतरता आणि विश्वासार्ह मध्यस्थीचा अभाव यामुळे अनेक तरुण-तरुणी विवाहाच्या प्रतीक्षेत आहेत. दुसरीकडे विवाहाच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीचे प्रकार लक्षात घेता स्थळ शोधण्यापासून विवाह निश्चित होईपर्यंत पारदर्शकता आणि पडताळणीला पूर्वीपेक्षा अधिक महत्त्व आले आहे.

आज प्रत्येक पालकाला आपल्या मुला-मुलीचे लग्न चांगल्या कुटुंबात व्हावे, जीवनसाथी सुशिक्षित, समजूतदार, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि चांगल्या स्वभावाचा असावा, अशी अपेक्षा असते. मुलगा असो किंवा मुलगी, शिक्षण, नोकरी किंवा व्यवसाय, आर्थिक स्थैर्य, राहण्याचे ठिकाण, कुटुंबाची पार्श्वभूमी, स्वभाव, सामाजिक प्रतिष्ठा, दिसणे आणि जीवनशैली अशा अनेक बाबींचा विचार केला जातो. या अपेक्षा चुकीच्या नाहीत; परंतु सर्वच अपेक्षा एकाच व्यक्तीमध्ये पूर्ण होतील, अशी परिस्थिती प्रत्येक वेळी असतेच असे नाही. त्यामुळे अपेक्षा आणि वास्तव यांच्यात समतोल साधणे ही आजच्या विवाह जुळवणीतील महत्त्वाची गरज बनली आहे.

अनेक वेळा मुलगा चांगला असूनही मुलीच्या कुटुंबाच्या अपेक्षा वेगळ्या असतात, तर मुलगी सुशिक्षित आणि सक्षम असूनही मुलाच्या कुटुंबाच्या अपेक्षा जुळत नाहीत. कुठे नोकरीचे ठिकाण, कुठे आर्थिक परिस्थिती, कुठे कुटुंबातील जबाबदाऱ्या, तर कुठे विचारसरणी आणि जीवनशैली यामुळे स्थळ नाकारले जाते. काही वेळा अगदी किरकोळ कारणांमुळेही चांगली स्थळे हातातून निघून जातात. परिणामी अनेक तरुण-तरुणींचे विवाहाचे वय पुढे जात राहते आणि पालकांसह त्यांच्यावरही मानसिक दबाव वाढत जातो.

आजच्या तरुण पिढीसमोर योग्य जीवनसाथीची निवड हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. शिक्षण आणि करिअरमध्ये स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या तरुण-तरुणींना आता केवळ विवाह करायचा म्हणून विवाह करण्याची मानसिकता राहिलेली नाही. त्यांना विचार जुळणारा, स्वभाव समजून घेणारा, करिअर आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा आदर करणारा तसेच भविष्यातील जबाबदाऱ्या स्वीकारणारा जीवनसाथी अपेक्षित असतो. ही अपेक्षा स्वाभाविक आहे. मात्र स्वतःच्या अपेक्षांकडेही वास्तववादीपणे पाहणे आवश्यक आहे. परिपूर्ण व्यक्ती शोधण्यापेक्षा परस्पर समजूतदारपणा आणि सामंजस्य निर्माण करू शकणारी व्यक्ती शोधणे अधिक महत्त्वाचे आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत विश्वासार्ह मध्यस्थीची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पूर्वी कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती, नातेवाईक, मित्रमंडळी किंवा समाजातील विश्वासू व्यक्ती विवाह जुळवण्याचे काम करत असत. त्यामुळे मुलगा-मुलगी आणि त्यांच्या कुटुंबाची प्राथमिक माहिती परिचयातून मिळत असे. आज मात्र सोशल मीडिया, ऑनलाइन मॅट्रिमोनी संकेतस्थळे आणि विविध डिजिटल माध्यमांमुळे स्थळ शोधण्याच्या संधी वाढल्या आहेत. मात्र त्याचबरोबर अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवण्याचा धोका देखील वाढला आहे.

विवाहाच्या नावाखाली चुकीची माहिती देणे, वैवाहिक स्थिती लपवणे, नोकरी किंवा व्यवसायाबाबत खोटी माहिती सांगणे, बनावट प्रोफाइल तयार करणे, आर्थिक फसवणूक करणे किंवा भावनिक संबंध निर्माण करून गैरफायदा घेण्याचे प्रकारही समोर येत आहेत. त्यामुळे केवळ फोटो, बायोडाटा किंवा सोशल मीडिया प्रोफाइलच्या आधारे स्थळ निश्चित करणे धोकादायक ठरू शकते. मुलगा किंवा मुलीचे शिक्षण, नोकरी, व्यवसाय, कुटुंबाची माहिती आणि वैवाहिक स्थिती यांसारख्या आवश्यक बाबींची योग्य ती पडताळणी करणे गरजेचे आहे. मध्यस्थाची भूमिका त्यामुळे केवळ दोन बायोडाटा एकमेकांपर्यंत पोहोचवण्यापुरती मर्यादित राहू नये. विश्वासार्ह मध्यस्थाने दोन्ही कुटुंबांची प्राथमिक माहिती समजून घेणे, अपेक्षा स्पष्ट करणे, उपलब्ध माहितीची शक्य तितकी पडताळणी करणे आणि दोन्ही बाजूंमध्ये पारदर्शक संवाद घडवून आणणे आवश्यक आहे. मध्यस्थीमध्ये विश्वास, गोपनीयता, पारदर्शकता आणि जबाबदारी या बाबींना सर्वोच्च महत्त्व असले पाहिजे. विवाह हा दोन व्यक्तींच्या आयुष्याचा निर्णय असल्याने मध्यस्थी करणाऱ्यांनीही या कामाकडे सामाजिक जबाबदारी म्हणून पाहण्याची गरज आहे. यासोबतच पालकांनीही आपल्या अपेक्षांचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. मुलगा किंवा मुलगी विवाहयोग्य वयात आल्यानंतर समाजातील इतर मुला-मुलींशी तुलना करणे, सतत लग्नासाठी दबाव आणणे किंवा 'आता वय वाढत चालले आहे' अशा प्रकारच्या बोलण्याने परिस्थिती अधिक कठीण होते. विवाह जुळत नाही म्हणून मुलगा किंवा मुलगी दोषी आहे, असे मानणे चुकीचे आहे. प्रत्येक व्यक्तीचे आयुष्य, परिस्थिती, करिअर आणि योग्य जोडीदार मिळण्याची वेळ वेगळी असते. त्यामुळे पालकांनी दबावापेक्षा संवाद आणि मार्गदर्शनाला प्राधान्य दिले पाहिजे.

विशेषतः मुलगा किंवा मुलगी यांची संमती आणि पसंती ही विवाहाच्या निर्णयातील केंद्रबिंदू असली पाहिजे. पालकांचा अनुभव आणि मार्गदर्शन महत्त्वाचे असले तरी आयुष्यभराचा संसार ज्यांना करायचा आहे, त्यांचे मत सर्वांत महत्त्वाचे आहे. केवळ कुटुंबाची प्रतिष्ठा, आर्थिक परिस्थिती किंवा समाजातील मानमरातब पाहून विवाहाचा निर्णय घेण्याऐवजी दोन व्यक्तींचे विचार, स्वभाव, जबाबदारीची जाणीव आणि भविष्यातील अपेक्षा यांचा विचार करणे आवश्यक आहे.

आज अनेक ठिकाणी आर्थिक परिस्थिती आणि सामाजिक प्रतिष्ठेलाही विवाह जुळवताना अनावश्यक महत्त्व दिले जाते. मुलाचा पगार किती, स्वतःचे घर आहे का, व्यवसाय किती मोठा आहे, मुलीचे कुटुंब किती सक्षम आहे, अशा अनेक प्रश्नांमुळे योग्य स्थळे नाकारली जातात. आर्थिक स्थैर्य महत्त्वाचे असले तरी विवाहाचे यश केवळ पैशावर ठरत नाही. स्वभाव, परस्पर आदर, संवाद, विश्वास, जबाबदारी आणि संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याची तयारी यावर संसाराची खरी उभारणी होत असते.

विवाह जुळवताना प्रत्येक व्यक्तीमध्ये सर्व गुण असतीलच असे नाही. त्यामुळे 'सगळेच गुण असलेले स्थळ' शोधण्याच्या प्रयत्नात योग्य स्थळे नाकारण्यापेक्षा कोणत्या गोष्टी जीवनासाठी अत्यावश्यक आहेत आणि कोणत्या बाबतीत परस्पर सामंजस्य साधता येऊ शकते, याचा विचार करण्याची गरज आहे. अपेक्षा असाव्यात; पण त्या व्यवहार्य असाव्यात. योग्य स्थळाच्या प्रतीक्षेत अनेक तरुण-तरुणींचे वय वाढत जाते. त्यानंतर स्थळांची उपलब्धता, अपेक्षा आणि कुटुंबीयांचा दबाव या सर्व गोष्टी अधिक गुंतागुंतीच्या होतात. विवाहासाठी घाई करणे योग्य नाही; मात्र योग्य वेळेत नियोजनबद्ध पद्धतीने स्थळ शोधणे, विश्वासार्ह माध्यमांचा उपयोग करणे आणि योग्य मार्गदर्शन घेणेही आवश्यक आहे.

विवाह जुळवणे आणि विवाह यशस्वीपणे टिकवणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. योग्य स्थळ मिळाले, अपेक्षा जुळल्या आणि विवाह झाला म्हणजे संसार परिपूर्ण झाला असे नाही. वास्तविक विवाहानंतरच दोन व्यक्तींच्या समजूतदारपणाची, जबाबदारीची, कर्तव्याची आणि विश्वासाची खरी परीक्षा सुरू होते. विवाहानंतर पती-पत्नीने एकमेकांकडून केवळ अपेक्षा ठेवण्यापेक्षा आपल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये समजून घेणे आवश्यक आहे. संसार हा एकट्या व्यक्तीने चालत नाही; तो दोघांच्या सहभागाने आणि परस्पर सहकार्याने पुढे जातो. आर्थिक जबाबदाऱ्या, घरातील निर्णय, मुलांचे संगोपन, दोन्ही कुटुंबांशी असलेले संबंध, करिअर, वैयक्तिक वेळ आणि कौटुंबिक अडचणी या सर्व बाबतीत परस्पर समन्वय आवश्यक असतो.

विश्वास हा कोणत्याही विवाहाचा सर्वांत मजबूत आधार असतो. एकमेकांशी प्रामाणिक राहणे, महत्त्वाच्या गोष्टी लपवून न ठेवणे, गैरसमज निर्माण झाल्यास संवादातून ते दूर करणे आणि संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे हीच वैवाहिक नात्याची खरी ताकद आहे. प्रत्येक छोट्या मतभेदाला संघर्षाचे स्वरूप न देता समोरच्या व्यक्तीचा दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न केला तर अनेक समस्या सुरुवातीलाच दूर होऊ शकतात. आजच्या काळात विवाह टिकवताना बाह्य आकर्षणापेक्षा विश्वास, संवाद, परस्पर आदर आणि भावनिक आधार अधिक महत्त्वाचा आहे. प्रत्येक संसारात मतभेद होऊ शकतात. दोन वेगवेगळ्या व्यक्ती एकत्र आयुष्य जगत असल्याने प्रत्येक बाबतीत एकमत होईलच असे नाही. मात्र मतभेद झाले म्हणून नाते तोडण्याऐवजी संवादातून मार्ग काढण्याची तयारी असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे हिंसा, फसवणूक, गंभीर अन्याय किंवा छळ सहन करणे म्हणजे संसार टिकवणे नव्हे; अशा परिस्थितीत योग्य मदत आणि मार्गदर्शन घेणेही तितकेच आवश्यक आहे.

विवाहानंतर दोन्ही कुटुंबांची भूमिकाही महत्त्वाची असते. नवविवाहित दाम्पत्याच्या प्रत्येक निर्णयात अनावश्यक हस्तक्षेप करण्यापेक्षा त्यांना स्वतःचे नाते समजून घेण्यासाठी आवश्यक ते स्वातंत्र्य आणि आधार देणे गरजेचे आहे. किरकोळ कौटुंबिक मतभेदांना वाढवण्याऐवजी समेट घडवून आणणे आणि नवदाम्पत्याला मानसिक आधार देणे ही कुटुंबातील ज्येष्ठांची जबाबदारी असली पाहिजे. विवाह म्हणजे अधिकारांइतकीच कर्तव्यांचीही भागीदारी आहे. पतीने पत्नीच्या स्वप्नांचा, करिअरचा आणि मतांचा आदर केला पाहिजे, तर पत्नीनेही पतीच्या जबाबदाऱ्या, संघर्ष आणि भावनांचा विचार केला पाहिजे. दोघांनीही एकमेकांना आपल्या मनाप्रमाणे बदलण्यापेक्षा एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न केला तर संसार अधिक मजबूत होतो. म्हणून विवाहाच्या चर्चेत केवळ ''स्थळ कसे आहे?'', ''पगार किती आहे?'', ''घर आहे का?'' किंवा ''कुटुंबाची परिस्थिती कशी आहे?'' एवढेच प्रश्न न विचारता ''दोघे एकमेकांवर विश्वास ठेवून आयुष्यभराची जबाबदारी स्वीकारण्यास तयार आहेत का?'' हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. या सर्व परिस्थितीत समाजातील ज्येष्ठ व्यक्ती, सामाजिक संस्था, विवाह मंडळे आणि विश्वासार्ह मध्यस्थ यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. स्थानिक पातळीवर पारदर्शक आणि विश्वासार्ह विवाह परिचय व्यवस्था निर्माण झाली तर अनेक कुटुंबांना त्याचा फायदा होऊ शकतो. विशेषतः विवाहाच्या नावाखाली होणारी फसवणूक रोखण्यासाठी माहितीची पडताळणी आणि सुरक्षिततेबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे.

विवाह जुळवताना आर्थिक व्यवहार किंवा कोणत्याही प्रकारच्या अवाजवी मागणीला प्रोत्साहन न देता साधेपणा, समानता आणि परस्पर सन्मान यांना महत्त्व दिले पाहिजे. विवाह हा प्रतिष्ठेची स्पर्धा किंवा आर्थिक व्यवहार नसून दोन व्यक्तींनी आयुष्यभर एकमेकांना साथ देण्याचा निर्णय आहे, ही जाणीव समाजात अधिक दृढ होणे आवश्यक आहे.

आज विवाहाच्या समस्या वाढत असतील तर त्याचे उत्तर केवळ अधिक स्थळे शोधण्यात नाही, तर योग्य स्थळ शोधण्याची पद्धत बदलण्यात आहे. तरुण-तरुणींनी स्वतःच्या अपेक्षांकडे वास्तववादीपणे पाहावे, पालकांनी अनावश्यक दबाव टाळावा, मध्यस्थांनी पारदर्शकता आणि विश्वास जपावा, तर समाजाने विवाहाकडे केवळ सामाजिक जबाबदारी म्हणून नव्हे तर दोन व्यक्तींच्या आयुष्याचा महत्त्वपूर्ण निर्णय म्हणून पाहावे. स्थळ शोधताना विवेक हवा, विवाह ठरवताना पडताळणी हवी, विवाह करताना संमती हवी आणि विवाह टिकवताना विश्वास, जबाबदारी, कर्तव्य, संवाद व समजूतदारपणा हवा. कारण विवाहाचा दिवस हा संसाराचा शेवट नसतो; तो दोन व्यक्तींनी एकत्र आयुष्य घडवण्याची सुरुवात असते.

योग्य विवाह जुळला तर दोन व्यक्तींचे आयुष्य घडते; पण चुकीचा निर्णय अनेक आयुष्यांवर परिणाम करू शकतो. म्हणून विवाह जुळवताना घाई नको, अवास्तव अपेक्षा नकोत आणि अंधविश्वास तर अजिबात नकोहवी आहे ती विश्वासार्ह मध्यस्थी, योग्य पडताळणी, परस्पर समजूतदारपणा आणि दोन मनांची प्रामाणिक संमती. विवाह केवळ 'जुळवायचा' नसतो; तो योग्य पद्धतीने 'घडवायचा' आणि विश्वास, कर्तव्य व जबाबदारीने आयुष्यभर 'टिकवायचा' असतो.

पान १ वरून

## परदेशींच्या न्यायासाठी नगरकर एकवटले

अशी मागणी आंदोलकांनी केली.

बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा आणि संवेदनशील भागांत पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली. पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांनी शहरातील प्रमुख चौक, संवेदनशील भाग आणि बाजारपेठ परिसराची पाहणी करून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून परिस्थितीची माहिती घेतली. संवेदनशील भागात गस्त वाढविणे, आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करणे तसेच परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## महाराष्ट्राच्या प्रश्नांवर मोदींशी चर्चा : सुळे

यांच्याकडे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीची अत्यंत आस्थेने विचारणा केली. या वेळी बोलताना पंतप्रधानांनी शरद पवारांच्या कार्यशैलीचा आणि राजकीय जीवनप्रवासाचा गौरव केला. शरद पवार यांच्यातील कामाची ऊर्जा आणि उत्साह हा राजकारणातील प्रत्येकासाठी एक उत्तम आदर्श आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी पवारांच्या कामाचे कौतुक केले. या बैठकीदरम्यान राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) खासदारांनी महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या मागण्या पंतप्रधानांसमोर मांडल्या आहेत.

संतांची अन् विचारवंतांची परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक महात्मा जोतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा, अशी मागणी खासदारांनी केली. बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर भाष्य करत उजनी धरणाचे पाणी मांजरा धरणात सोडून बीडला दिलासा देण्याची मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केली. याशिवाय पीएम केअर्स निधीतून गंभीर आजारांच्या उपचारांसाठी मिळणाऱ्या मदतीचा कोटा सर्व खासदारांसाठी वाढवावा, असा मुद्दा मांडण्यात आला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्राकडे पाठवला असून, यावर केंद्राने तत्काळ अंतिम निर्णय घ्यावा, अशी विनंती खासदार सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे आणि डॉ. अमोल कोल्हे यांनी केली.

नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्प, पुणे-नाशिक मेट्रो, छत्रपती संभाजीनगर येथील पीएम गतिशक्ती योजना, जेएनपीटी बंदर आणि कल्याण-मुरबाड रेल्वे मार्गाच्या कामांना गती देण्याबाबत पंतप्रधानांचे लक्ष वेधण्यात आले. खा. निलेश लंके यांनी वाढत्या कर्करोग उपचारांच्या सुविधांवर चर्चा केली, तर चंद्रभागा नदीचे प्रदूषण, कांद्याचे भाव यांसारख्या मुद्द्यांवरही खासदारांनी विचार मांडले.

## देवीभोयरेत व्यासपीठावरच महायुतीत तू-तू, मैं-मैं!

आणि लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सुरळीत झाली. मात्र अशोकराव सावंत यांच्या भाषणाने वातावरण अचानक बदलले. सावंत यांनी विविध विकासकामांचे श्रेय राष्ट्रवादी काँग्रेसला असल्याचे सांगितले. तसेच देवीभोयरे देवस्थानाला ब वर्ग दर्जा मिळवून देण्याचे श्रेयही राष्ट्रवादीकडे असल्याचा दावा त्यांनी केला. सावंत यांच्या या वक्तव्यावर विश्वनाथ कोरडे यांनी नाराजी व्यक्त केली.

आ. काशिनाथ दाते यांच्याकडे पाहत कोरडे म्हणाले की, आमदार साहेब, यामुळेच आम्ही तुमच्या कार्यक्रमांना येत नाही. या एका वक्तव्याने व्यासपीठावरील वातावरण तापले. तुझं मी ऐकत नाही. कोरडे यांच्या वक्तव्याला सावंत यांनीही आक्रमक प्रत्युत्तर दिले. ऐ, तुझं मी ऐकत नाही! असे सावंत म्हणाले. त्यावर कोरडे यांनीही माघार घेतली नाही. काय फालतूगिरी आहे ही? यांच्यामुळे आम्ही येत नाही. मुद्यांवर बोल!, असं कोरडे यांनी सुनावलं. सावंत यांनी आपली भूमिका कायम ठेवत मी मुद्यावर बोलतोय. कुणाच्याही दडपणाखाली मी वागणार नाही, असं स्पष्ट केलं. त्यावर कोरडे यांचं प्रत्युत्तर नका दडपणाखाली वागू, इथे कशाला इज्जत घेता? व्यासपीठावरील हा शाब्दिक संघर्ष पाहून उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली. वाद वाढत असल्याचे लक्षात येताच आ. काशिनाथ दाते यांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. मात्र सावंत यांनी आपले म्हणणे पूर्ण करण्याचा आग्रह धरला. एक मिनिट सर, मी जिल्हाध्यक्ष आहे. मला बोलायचंय, अशी भूमिका सावंत यांनी घेतली. त्यावर कोरडे यांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. ते जिल्हाध्यक्ष तुमच्या घरी; आमच्याकडे चालू देणार नाही, अशा शब्दांत त्यांनी भूमिका मांडली. या तालुक्याचा आमदार आमच्या पक्षाचा आहे. कामांचे श्रेय आमचेच आहे, असे सावंत यांनी सांगितले. यावरही सावंत यांनी आपली भूमिका सोडली नाही. परिस्थिती चिघळत असल्याचे पाहून आमदार दाते यांनी सावंत यांना माईकपासून दूर करण्याचा प्रयत्न केला.

यावेळी सावंत यांनी नाराजी व्यक्त करत आम्ही यायचे नाही का? असा सवाल केला. मी काही कच्च्या गुरूचा चेला नाही! यानंतर सावंत यांचा पारा आणखी चढला. ते म्हणाले की, देवीभोयरेच नाही तर तालुक्यात कुठेही कोरडे यांची मनमानी खपवून घेणार नाही. मी दाखवून देईन. मी काही कच्च्या गुरूचा चेला नाही. त्यावर कोरडे यांनीही थेट आव्हान दिले दाखव, इथे दाखव आता! वादाच्या ओघात कोरडे यांनी सावंत यांच्यासाठी बिनडोक हा शब्द वापरल्याचेही समोर आले. त्यावर सावंत यांनी आक्षेप घेतला. मात्र त्यानंतरही शाब्दिक चकमक थांबली नाही. कार्यकर्त्यांनी दोन्ही नेत्यांना शांत करण्याचा प्रयत्न केल्यानंतर अखेर आ. दाते यांनी भूमिका स्पष्ट केली.

दाते यांनी महायुतीतील शिस्तीचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले मी फक्त राष्ट्रवादीचा आमदार नाही. मी भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी, आरपीआय आणि इतर घटक पक्षांचा आमदार आहे. कार्यक्रम आयोजित केल्यानंतर महायुतीतील सर्व पदाधिकाऱ्यांना आमंत्रित केले जाते आणि कार्यक्रमात महायुतीची शिस्त पाळली पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पान १ वरून

## संगमनेरात बनावट दारूचा पर्दाफाश

३८ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी शिवकुमार मनोज कुमार कालडा आणि सौरभ अरविंद पापडेजा (दोघेही रा. संगमनेर) यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने दोघांनाही तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने ताब्यात घेतलेल्या संशयितांची चौकशी केली असता, बनावट पद्धतीने तयार केलेले मद्य संगमनेर शहरातील नेहरू चौक येथील हॉटेल सुरभी एफ.एल.-३ (परवाना क्र. १९३) येथे विक्रीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती तपासात पुढे आली. त्यानंतर पथकाने हॉटेल सुरभीच्या मद्यविक्री दुकानावर छापा टाकून हजारो रुपयांच्या किमतीच्या बनावट दारूच्या बाटल्या जप्त केल्या.

या कारवाईमुळे बनावट दारूच्या प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक योगेश सावखेडकर, उपनिरीक्षक प्राची देखणे, उपनिरीक्षक प्रशांत गायकवाड तसेच वसंत पालवे, विपुल कर्पे, विमल घोलप, स्वाती फटांगरे, मोहिनी घोडेकर, सचिन बटुळे आणि ओंकार पालवे यांच्या भरारी पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास उपनिरीक्षक प्राची देखणे करीत आहेत.

## शेवगावचा सर्वांगीण विकास हेच ध्येय

मिळणार असल्याचे नागरिकांनी सांगितले.

या विकासकामासाठी नगरसेवक सागर फडके व नगरसेविका आशाताई खंडू बुलबुले यांनी विशेष प्रयत्न करून पाठपुरावा केल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यांच्या प्रयत्नांमुळे प्रभागातील विविध विकासकामांना गती मिळत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. भूमिपूजन कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक, शेवगाव नगरपरिषदेचे अधिकारी पगारे, ज्येष्ठ नागरिक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुलै महिना सरला; बंधारा नाही भरला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बोधेगाव :** शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागात यंदाच्या पावसाळ्यात अद्याप दमदार पावसाने हजेरी लावलेली नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. जून महिन्याच्या अखेरीस सरासरी जेमतेम पावसाच्या जोरावर तालुक्यात सुमारे ६१ हजार ९५० हेक्टर क्षेत्रावर खरिपाची लागवड करण्यात आली. त्यानंतर झालेल्या रिमझिम पावसावर पिके कशीबशी तग धरून आहेत. मात्र जुलै महिना संपूनही मोठा पाऊस न झाल्याने नदीनाले, बंधारे व जलसाठे कोरडेठाक असल्याचे चित्र आहे.

तालुक्यातील बोधेगाव, बालमटाकळी, लाडजळगाव, गोळेगाव, नागलवाडी, शेकटे, बाडगव्हाण, ठाकूर पिंपळगाव, सोनविहीर, अधोडी, दिवटे, राणेगाव, शिंगोरी, आंतरवाली यांसह परिसरातील अनेक गावे अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. या भागातील बहुतांश जिरायती शेती पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने पावसाचा खंड पडल्यास त्याचा थेट परिणाम पिकांवर होतो. जुलै महिना सरला तरी परिसरात अद्याप एकही दमदार पाऊस झालेला नाही. त्यामुळे नदीनाले वाहिले नाहीत आणि बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा झालेला नाही. परिणामी भूगर्भातील पाणीपातळीतही अपेक्षित वाढ झालेली नाही. विहिरी व कूपनलिकांनी तळ गाठण्यास सुरुवात केली असून आगामी काळात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

खरिपाबरोबरच आता शेतकऱ्यांना रब्बी हंगामाची चिंता सतावू लागली आहे. ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये दमदार पाऊस झाला नाही तर बंधारे व जलसाठे भरणार नाहीत. त्यामुळे भूगर्भातील पाणीपातळी वाढणार नसून विहिरी व कूपनलिकांवर आधारित रब्बीची पिके घेणेही कठीण होण्याची शक्यता आहे.

# पद्मश्रीप्राप्त दिग्गजांची मुंबईत अनोखी भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** आदिवासी क्रांती दिनानिमित्त मुंबईत आयोजित सामाजिक कार्यक्रमात आदिवासी समाजातील दोन मानकरी व्यक्तिमत्त्वांची अनोखी भेट झाली. पद्मश्री पुरस्कारप्राप्त बीजमाता राहीबाई पोपेरे आणि प्रसिद्ध तारपा वादक पद्मश्री भिकल्या धिंडा हे दोघेही एका मंचावर एकत्र आले. त्यांच्या भेटीने उपस्थितांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी दोघांनीही एकमेकांच्या कार्याचा सन्मान करत आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल समाधान व्यक्त केले. भिकल्या धिंडा यांनी राहीबाई पोपेरे यांच्या बीजसंकलन, गावरान बियाण्यांचे संवर्धन आणि प्रचार-प्रसाराच्या कार्याचा गौरव करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

भिकल्या धिंडा यांची भेट घेण्याची इच्छा राहीबाई पोपेरे यांनी यापूर्वी अनेकदा व्यक्त केली होती. अखेर आदिवासी क्रांती दिनाच्या महत्त्वपूर्ण दिवशी दोघांची भेट झाल्याने त्यांनीही आनंद व्यक्त केला. या भेटीदरम्यान भिकल्या धिंडा यांनी तारपा वादन सादर केले. राहीबाई पोपेरे यांनी तारपा संगीताचा आनंद घेत आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

धिंडा यांनी पोपेरे यांच्या कार्याचा गौरव करत त्या आदिवासी समाजासाठी बहुमान असल्याचे गौरवोद्गार काढले. बीजसंवर्धन आणि पारंपरिक वाद्यकलेच्या माध्यमातून आदिवासी संस्कृती जपणाऱ्या या दोन पद्मश्री व्यक्तिमत्त्वांना एकाच मंचावर पाहण्याचा अनुभव उपस्थितांसाठी विशेष ठरला. त्यांच्या विचारांचे उपस्थितांनी मनोभावे श्रवण केले.

# विकासकामांवर आता राहणार सॅटेलाइटचा पहारा

## ऑक्टोबरपासून भ्रष्टाचाराला बसणार कायमचा चाप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : गावात एखादा नवा रस्ता किंवा पूल मंजूर होतो, सरकारी तिजोरीतून त्याच्या बांधकामासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्ची पडतो, आणि कागदोपत्री तो प्रकल्प चकाचक पूर्ण झाल्याचे दाखवून कंत्राटदार त्याचे बिलही तत्परतेने खिशात घालतात. पण, प्रत्यक्षात त्या गावात जाऊन पाहिले, तर तिथे रस्त्याऐवजी फक्त मोठे खड्डे आणि धूळच उडत असते! वर्षानुवर्षे सुरू असलेली भ्रष्टाचाराची ही साखळी आणि शासकीय निधीचा चाललेला हा डबलगेम आता कायमचा संपुष्टात येणार आहे.



कारण, कागदावरच विकासकामे उभी करून राज्याच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्या प्रवृत्तीवर आता थेट आकाशातून सॅटेलाइटचा (उपग्रह) कडक पहारा बसणार आहे. राज्यातील सार्वजनिक पायाभूत विकासकामांमध्ये टक्के पारदर्शकता आणण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी १०० आगामी १ ऑक्टोबरपासून प्रत्येक विकासप्रकल्पासाठी जिओ टॉड युनिक इन्फ्रा आयडी बंधनकारक करण्याचा महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) माध्यमातून दरवर्षी ग्रामीण आणि शहरी भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला जातो. मात्र, अनेकदा प्रत्यक्ष जमिनीवर कोणतेही काम न होता केवळ कागदोपत्री पूर्तता दाखवून निधी हडप करण्याचे प्रकार वारंवार समोर येत होते.

काही प्रकरणांमध्ये जुन्याच कामांवर नवीन पाट्या लावून किंवा एकाच विकासकामाचे दोन वेगवेगळ्या योजनांमधून दुबार बिल उचलून शासकीय तिजोरीला मोठा चुना लावला जात होता.

या गैरप्रकारांची आता शासनाने अत्यंत गंभीर दखल घेतली असून, विकासकामांचे संपूर्ण ताळेबंद थेट डिजिटल पटलावर आणण्याचा निर्णय घेतला आहे. या महत्त्वाकांक्षी मोहिमेची व्याप्ती प्रचंड मोठी ठेवण्यात आली आहे. यात केवळ आगामी काळात मंजूर होणाऱ्या नव्या प्रकल्पांचाच समावेश नाही, तर वर्ष २०२१ पासून आजतागायत मंजूर झालेली, सुरू असलेली तसेच पूर्ण झालेली सर्व लहान-मोठी विकासकामे या प्रणालीच्या कक्षेत आणली जाणार आहेत.

राज्यातील प्रत्येक विकासकामाची संपूर्ण माहिती, त्याचे रेखांशासह अचूक भौगोलिक स्थान आणि प्रत्यक्ष कामाची स्थिती ऑनलाइन नोंदवली जाईल. यामुळे शासकीय अधिकाऱ्यांपासून ते सर्वसामान्य नागरिकांपर्यंत कोणालाही कोणत्याही विकासकामाची संपूर्ण कुंडली एका क्लिकवर पाहता येणार आहे.

### कसे काम करणार सॅटेलाइट ?

जिओ टॅग्ड युनिक इनका आयडी हा अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित एक डिजिटल ओळख क्रमांक आहे. हा क्रमांक थेट संबंधित विकासप्रकल्पाच्या प्रत्यक्ष भौगोलिक स्थानाशी (जीपीएस लोकेशन) जोडलेला असेल. सॅटेलाइट मॅपिंग आणि डिजिटल नकाशांच्या माध्यमातून काम प्रत्यक्षात जमिनीवर सुरू आहे की नाही, किती टक्के काम पूर्ण झाले आहे आणि त्याचा दर्जा काय आहे, हे उपग्रहाद्वारे अत्यंत अचूकपणे तपासता येईल. यामुळे बोगस विकासकामे पूर्णपणे उघडी पडणार आहेत.

# साहित्यिक उत्तम कांबळे यांना पुरस्कार जाहीर!

## पद्मश्री विखे-पाटील जीवनगौरव पुरस्काराचे २७ ऑगस्टला वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या १२६ व्या जयंती दिनाच्या निमित्ताने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय साहित्य, कलागौरव आणि प्रबोधन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यंदाच्या वर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे साहित्य जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना, राज्यस्तरीय नाट्यसेवा पुरस्कार सचिन शिंदे यांना आणि राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार मालती इनामदार यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांनी दिली.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या जयंती दिनी साहित्य, कला, नाट्य आणि प्रबोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम प्रवरा परिवाराने सुरू केलेला आहे. यंदाचे पुरस्काराचे हे ३६ वे वर्ष आहे. पद्मश्रींच्या जयंती दिनी गुरुवार दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी नारळी पौर्णिमेला प्रवरानगर येथे राज्य आणि जिल्हास्तरीय पुरस्कारांचे वितरण ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या शुभहस्ते आणि जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के-पाटील, कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे-पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या निवड समितीत अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्यासह डॉ. एकनाथ पगार, डॉ. दिलीप धोंगडे आणि प्रा. डॉ. राजेंद्र सलालकर यांनी काम पाहिले.

यावर्षी ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना साहित्य जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ''समितीच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार (रुपये ५१ हजार आणि स्मृतिचिन्ह) पुणे येथील संहिता राजन यांच्या 'चल गं सखे वारुळाला' या कथासंग्रहास दिला जाणार आहे. सुरेंद्र सुपेकर यांच्या समर ऑफ सेव्हेंटी नाईन या कादंबरीस राज्यस्तरीय विशेष साहित्य पुरस्कार (रुपये २५ हजार आणि स्मृतिचिन्ह) देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

'' मातोश्री विठाबाई नारायणगावकर यांच्याकडून नृत्य व संगीताचे धडे घेऊन तमाशा कलेला पुढे घेऊन जाणाऱ्या मालती इनामदार यांना राज्यस्तरीय कलागौरव तमाशा कलावंत पुरस्कार (रुपये २५ हजार आणि स्मृतिचिन्ह) देऊन गौरविले जाणार आहे.

# घारगावात आदिवासी दिन उत्साहात

## रानभाज्यांच्या प्रदर्शनाने वेधले लक्ष; रॅलीमध्ये तरुणाईचा उत्साह





**जनता आवाज वृत्तसेवा**

**साकूर** : संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील घारगाव येथे जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. बसस्थानक परिसरापासून निघालेल्या भव्य रॅलीने संपूर्ण गावाचे लक्ष वेधून घेतले. डीजेच्या तालावर थिरकणारी तरुणाई, पारंपरिक वेशभूषेतील नागरिक, महिला आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सहभागामुळे घारगावचा पठारभाग अक्षरशः दुमदुमून गेला. घारगाव बसस्थानक परिसरातून रॅलीला सुरुवात झाली.

पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेले नागरिक आणि डीजेच्या तालावर उत्साहात सहभागी झालेली तरुणाई यामुळे रॅलीला मोठा प्रतिसाद मिळाला. ही रॅली भारत हायस्कूलच्या प्रांगणात पोहोचली. याठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमाच्या सुरुवातीला विविध क्रांतिकारकांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमात अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे, बोटा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य जनार्दन आहेर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

रॅलीचा जल्लोष, आदिवासी संस्कृतीचा जागर, रानभाज्यांचे प्रदर्शन, विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक सादरीकरण आणि तरुणाईचा उत्साह यामुळे यंदाचा जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाची सांगता उपस्थितांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मिष्ठान्न भोजनाने करण्यात आली कार्यक्रमातील उत्साहाचा कळस आ. लहामटे यांच्या स्वागतावेळी पाहायला मिळाला. उत्साही तरुणांनी लहामटे यांना चक्क खांद्यावर उचलून घेत डीजेच्या तालावर ठेका धरला. यावेळी तरुणाईने जोरदार जल्लोष करत परिसर दणाणून सोडला. सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांनी सादर केलेले आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारे नृत्याविष्कार. पारंपरिक वेशभूषा, चालीरीती आणि सांस्कृतिक परंपरा विद्यार्थ्यांनी आपल्या कलाविष्कारातून उपस्थितांसमोर प्रभावीपणे मांडल्या.

### विद्यार्थ्यांचा गौरव

कार्यक्रमादरम्यान परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला पाठबळ मिळावे, या उद्देशाने त्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. या सोहळ्यासाठी केवळ पठार भागातूनच नव्हे, तर संगमनेर, अकोले, जुन्नर आणि पारनेर तालुक्यांतूनही मोठ्या संख्येने तरुण, महिला आणि नागरिक घारगावात दाखल झाले होते.

# अकोले- कसारा एसटी बस सेवा होणार पूर्ववत

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अकोले** : अकोले तालुक्यातील म्हैसवळण घाट मार्गे धावणारी अकोलेकसारा एसटी बस सेवा गेल्या अनेक दिवसांपासून बंद होती. ही बस सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी चंदगिरवाडीचे युवा उद्योजक नामदेव घोरपडे तसेच ॲड. सिध्देश्वर लांघी तसेच एकदरे चंदगिरवाडीचे ग्रामस्थ यांचा सहकार्याने अकोले आगाराचे आगारप्रमुख सुरेश दराडे यांची भेट घेऊन अकोले, देवठाण, केळी, सांगवी, म्हैसवळण घाट मार्गे कसारा एसटी बस सेवा सुरू करण्याबाबत निवेदन देण्यात आले. या निवेदनाची तत्काळ दखल घेत आगारप्रमुखांनी १७ ऑगस्ट २०२६ पासून बस सेवा पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले. या बस सेवेमुळे परिसरातील गावांतील नागरिकांना सुलभ, सुरक्षित आणि वेळेवर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असून दळणवळणाचा महत्त्वाचा प्रश्नही मार्गी लागणार आहे.तसेच या बस सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यास याच मार्गावर आणखी एक बस सुरू करण्याचाही सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आगारप्रमुख सुरेश दराडे यांनी सांगितले. मुंबईकडे नोकरी,व्यवसाय व इतर कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी ही बस सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याने परिसरातील नागरिकांनी या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी सुरेश बोऱ्हाडे, ॲड.सिद्धेश्वर लांघी, नामदेव घोरपडे, चंदगीरवाडीचे सरपंच यशवंता बेंडकोळी, नामदेव साबळे,बाळू आव्हाड तसेच परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# राजळे कॉलेज येथे लेखन प्रेरणा दिन

## निबंध स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पाथर्डी** : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तालुक्यातील आदिनाथनगर येथील लोकनेते आप्पासाहेब राजळे फार्मसी कॉलेज येथे लेखन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये लेखनाची आवड, सर्जनशीलता आणि साहित्यिक जाणिवा निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.लेखन प्रेरणा दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनप्रवास, साहित्यिक योगदान आणि सामाजिक विचारांवर आधारित निबंध विद्यार्थ्यांनी सादर केले. अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीतून समाजातील उपेक्षित व वंचित घटकांचे जीवन प्रभावीपणे मांडले गेले. त्यांच्या साहित्याचा विद्यार्थ्यांनी आपल्या लेखनातून घेतलेला वेध विशेष उल्लेखनीय ठरला.प्रथम क्रमांकअक्षता टेमकर, द्वितीय क्रमांक पुजा काकडे, तृतीय क्रमांक ऐश्वर्या पगारे यांनी पटकावला. तर सिद्धी पठाडे, भाग्यश्री शिरसाठ यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शांताराम खणगे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# आजोबांचा नातवासोबतच बुडून मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**





**संगमनेर** : नातवाला वाचवण्यासाठी शेततळ्यात उडी घेतलेल्या आजोबांचा नातवासोबतच बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ येथे रविवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली. या अपघातामुळे संपूर्ण परिसरात तीव्र शोककळा पसरली आहे. पांडुरंग रखमा गुळवे (वय ६५) आणि सर्वेश संतोष गुळवे (वय १३, दोघेही रा. गुळवे वस्ती, सावरगाव तळ, ता. संगमनेर) अशी मृत झालेल्या आजोबा-नातवाची नावे आहेत. गुळवे वस्तीवर राहणाऱ्या गुळवे कुटुंबाच्या घराशेजारीच शेततळे आहे. रविवारी सायंकाळी सर्वेशचा पाय घसरल्याने तो शेततळ्यात पडला. हा प्रकार त्याच्या मोठ्या बहिणीच्या लक्षात येताच तिने तात्काळ आरडाओरड केली. आवाज ऐकून जवळच असलेल्या आजोबा पांडुरंग गुळवे यांनी क्षणाचाही विचार न करता नातवाचे प्राण वाचवण्यासाठी शेततळ्यात उडी घेतली. मात्र, शेततळ्याच्या प्लास्टिक कागदावरील निसरडेपणा आणि पाण्याचा अंदाज न आल्यामुळे दोघेही पाण्यात अडकले आणि त्यांना बाहेर पडता आले नाही. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तातडीने धाव घेत दोघांनाही शेततळ्यातून बाहेर काढले आणि उपचारासाठी रुग्णालयात नेले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारापूर्वीच दोघांना मृत घोषित केले. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. पोलिस पाटील गोरक्ष नेहे यांनी दिलेल्या माहितीवरून संगमनेर तालुका पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्याचे काम सुरू होते.

# राहात्यातील सेतू कार्यालयाचा कारभार रामभरोसे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : शासनाच्या विविध दाखले, प्रमाणपत्रे नागरिकांना एकाच खिडकीतून देण्यासाठी सुरू केलेली सेतू सुविधा केंद्रे राहाता तालुक्यात मात्र वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत. संपूर्ण यंत्रणा काही मोजक्या एजंटांच्या प्रभावाखाली चालत असल्याच्या चर्चा सुरू झाल्याने नागरिकांनी पारदर्शक चौकशीची मागणी केली आहे.

स्थानिक पातळीवर असा आरोप केला जात आहे की, तालुक्यात अधिकृत समन्वयकाची नियुक्ती नसतानाही संपूर्ण सेतू व्यवस्थेचे संचालन केवळ दोन एजंटांच्या माध्यमातूनहोत आहे. ही जबाबदारी नेमकी कोणाच्या आदेशाने आणि कोणत्या प्रशासकीय अधिकाराखाली पार पाडली जात आहे, हा प्रश्न उपस्थित होतो.





याहून गंभीर बाब म्हणजे, काही ग्रामपंचायतींसाठी मंजूर करण्यात आलेली सेतू केंद्रे संबंधित ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात न चालवता अन्य गावांतून कार्यरत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. अशा प्रकारामुळे त्या गावातील सामान्य नागरिकांना आवश्यक कागदपत्रांसाठी विनाकारण प्रवास करावा लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. शासनाने दिलेल्या परवानगीच्या अटींचे पालन होत आहे का, याची तपासणी होणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

संबंधित विभागाने वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी केली का? मंजूर ठिकाणीच केंद्र सुरू आहे का, याची पडताळणी झाली का? नियमांचे उल्लंघन होत असल्यास कारवाई का झाली नाही? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

# 'चक्काजाम' सर्वपक्षीय नव्हे, एका कुटुंबापुरते मर्यादित

## आ. अमोल खताळ; तर मीच सर्वप्रथम रस्त्यावर उतरेन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या मागणीसाठी प्रस्तावित करण्यात आलेले चक्काजाम आंदोलन सर्वपक्षीय असल्याचा दावा केला जात असला, तरी या आंदोलनाबाबत आपल्याला कोणाचाही फोन अथवा निरोप आलेला नाही. त्यामुळे हे आंदोलन सर्वपक्षीय नसून एका कुटुंबापुरते आणि राजकीय कुरघोडीपुरते मर्यादित असल्याची टीका आमदार अमोल खताळ यांनी केली.

पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे झाली पाहिजे, ही आपली भूमिका सुरुवातीपासूनच स्पष्ट असल्याचे सांगत आमदार खताळ म्हणाले, ''पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्प हा संगमनेर आणि संपूर्ण परिसराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या प्रकल्पासाठी मी पूर्णपणे आग्रही आहे. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाबाबत तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचा शब्द दिला आणि तो शब्द पाळत ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती आपला अहवाल सादर करणार आहे. त्यामुळे अहवाल येण्यापूर्वीच आंदोलन करून जनतेला वेठीस धरण्यापेक्षा तज्ज्ञ समितीचा निष्कर्ष समोर येणे अधिक महत्त्वाचे आहे.'' आमदार खताळ पुढे म्हणाले, ''काकोडकर समितीचा अहवाल काय येतो, हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अहवाल सकारात्मक आला तर आपण त्याचे स्वागत करू.



मात्र, अहवाल प्रतिकूल आला आणि संगमनेरच्या हक्काच्या मार्गाला नकार दिला गेला, तर या तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून सर्वप्रथम मीच रस्त्यावर उतरेन. जनतेच्या हक्कासाठी वेळप्रसंगी उपोषण करण्याची वेळ आली तरी मी मागे हटणार नाही.'' आमदार आमदार खताळ म्हणाले ''लोकशाही व्यवस्थेत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, आंदोलन हे जनतेच्या प्रश्नासाठी असावे, राजकीय श्रेयासाठी नव्हे.

जनतेला वेठीस धरून किंवा वाहतूक व्यवस्था विस्कळीत करून राजकीय कुरघोडी साधणे योग्य नाही. पुणे-नाशिक रेल्वे हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा कुटुंबाचा विषय नसून संगमनेर, अहिल्यानगर, पुणे आणि नाशिकच्या भवितव्याशी जोडलेला विकासाचा प्रश्न आहे. त्यामुळे या प्रश्नावर प्रामाणिकपणा, सर्वसमावेशकता आणि एकजूट अपेक्षित आहे,'' असेही खताळ यांनी स्पष्ट केले.

### रेल्वेमंत्र्यांसोबत थेट पाठपुरावा

दरम्यान, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेच्या प्रश्नावर खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या समवेत नुकतीच नवी दिल्लीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन आपण या प्रकल्पासाठी ठोसपणे पाठपुरावा केल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.या भेटीदरम्यान रेल्वे मंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही पुणे-नाशिक रेल्वे मार्गासाठी आग्रह धरल्याचे सांगितले. केंद्र सरकारही या प्रकल्पाबाबत सकारात्मक असल्याचे रेल्वेमंत्र्यांनी स्पष्ट केल्याचे खताळ यांनी नमूद केले.

# भंडारदरा परिसर पर्यटकांनी गजबजला!

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अकोले** : अहिल्यानगर जिल्ह्याची चेरापुंजी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अकोले तालुक्यातील सह्याद्री पर्वतरांगांवर गेल्या पंधरवड्यापर्यंत सक्रिय असलेल्या पावसाने आता विश्रांती घेतली आहे. शनिवार-रविवारपासून आकाशातील काळेनिळे ढग दूर होऊन निरभ्र आकाश दिसू लागल्याने भंडारदरा परिसरातील धबधब्यांचा वेगही मंदावला आहे. पावसाने उसंत घेताच ऑगस्टच्या पहिल्याच विकेंडला निसर्गसौंदर्याचा आनंद लुटण्यासाठी हजारो पर्यटकांनी भंडारदरा परिसरात गर्दी केली. यंदाच्या पावसाळ्यात १ जूनपासून ९ ऑगस्टपर्यंत घाटघर येथे सर्वाधिक ३७६० मिमी, रतनवाडीत ३१४१ मिमी, पांजरे येथे २४४३ मिमी, भंडारदरा येथे २१३९ मिमी, तर वाकी जलाशयावर १८३० मिमी पावसाची नोंद झाली आहे. पावसामुळे भंडारदरा परिसरातील धबधबे प्रवाहित झाले होते. आता पाऊस कमी झाल्याने ते झुळूझुळू वाहू लागले आहेत. भंडारदरा धरण, आर्थर लेक पॉईंट, रंधा धबधबा, घाटनदेवी, कोकणकडा, पांजरे येथील वैशाली फॉल आणि रिंगरोड परिसरातील धबधबे पाहण्यासाठी शनिवारी-रविवारी पर्यटकांची मोठी गर्दी झाली. पार्किंगची व्यवस्था अपुरी पडल्याने अनेकांनी रस्त्याच्या कडेला वाहने उभी केली. परिणामी काही ठिकाणी वाहतूक कोंडी झाली.

*दरम्यान, धरणसाठ्यांची स्थिती समाधानकारक आहे. भंडारदरा धरण ९७.६२ टक्के, निळवंडे ९८.५४ टक्के, तर आढळा व वाकी धरणे शंभर टक्के भरली आहेत. भंडारदऱ्यातून ८१९ क्युसेक, आढळ्यातून ९८ क्युसेक आणि वाकीतून १९८ क्युसेक विसर्ग सुरू आहे.*

# जेथे काम थांबले, तेथूनच पुन्हा सुरू करा

## बाळासाहेब थोरातांची सरकारकडे मागणी; नाशिक-पुणे रेल्वे मार्गासाठी नागरिकांचा रास्ता रोको

**जनता आवाज वृत्तसेवा**
**संगमनेर** : नाशिक-पुणे हा रेल्वे मार्ग सरळ व्हावा याकरता संगमनेर तालुक्यातील हजारो नागरिकांनी एकत्र येत तीन तास ठिय्या आंदोलन केले. नागरिक महिला व युवकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे घोषणांच्या निनादात तीन तास चक्काजाम आंदोलन झाले. यावेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या हायस्पीड रेल्वे मार्गाकरता केंद्र व राज्य सरकारच्या सर्व मंजुरी मिळालेल्या असताना हे चांगले काम थांबले कसे असा सवाल करताना. जेथे रेल्वेचे काम थांबले तेथूनच काम सुरू करा, असे आवाहन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते



बाळासाहेब थोरात यांनी केंद्र व राज्य सरकारला केले आहे.

संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथे सर्वपक्षीय नागरिक, महिला, युवक, विद्यार्थी, शेतकरी या सर्वांच्या उपस्थितीमध्ये भव्य रास्ता रोको झाला. यावेळी ते बोलत होते.

तीन तास झालेल्या या रास्ता रोकोसाठी संगमनेर अकोल्यातून अनेक नागरिक उपस्थित होते. रेल्वे आमच्या हक्काची, नाशिक-पुणे सरळ रेल्वे झालीच पाहिजे या घोषणांनी परिसर दुमदुमला. रिमझिम पावसामध्ये ही हजारो नागरिक तीन तास रस्त्यावर बसून होते.

माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, नाशिक - पुणे सरळ रेल्वे करता आपण सातत्याने पाठपुरावा केला. २०१९ मध्ये सरकार सत्तेवर आल्यानंतर अधिक पाठपुरावा करताना स्वर्गीय अजितदादा यांनी सुद्धा यामध्ये मदत केली. केंद्र सरकार, नीती आयोग, राज्य सरकार, रेल्वे या सर्व विभागांच्या या सरळ मार्गासाठी मान्यता मिळालेले आहेत. राज्य सरकारने १००० कोटी रुपये रेल्वेला दिले त्यानंतर भूसंपादन सुरू झाले. गोल्डन ट्रँगल साठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या सरळ रेल्वे मार्गाचे काम थांबण्याचे काय कारण आहे ते कळत नाही. या अत्यंत चांगल्या कामात कुणी खोडा घातला. हा सवाल करताना सर्व मंजुऱ्या मिळताना जीएमआरडीची कोणतीही अडचण आली नव्हती. आताच अडचण आली कशी असा प्रश्न त्यांनी केला.

डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्ग हा नैसर्गिक आहे मात्र संगमनेर तालुक्याचा विकास थांबवण्यासाठी काही मंडळींनी जाणीवपूर्वक या मार्गामध्ये बदल केला आहे.

### आ. तांबेंच्या अटकेची बातमी कळताच आंदोलन आक्रमक

नाशिक – पुणे सरळ रेल्वे मार्गासाठी आमदार सत्यजित तांबे यांच्या नेतृत्वाखाली समृद्धी महामार्गावर शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू होते. संगमनेर, सिन्नर,नारायणगाव,आळेफाटा,चाकण या सर्व ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनाची दखल सर्व माध्यमांनी घेतली. केंद्र सरकारपर्यंत या आंदोलनाची धग पोहोचल्यानंतर आमदार सत्यजित तांबे यांना अटक करण्यात आली. ही बातमी माध्यमांवर झळकल्यानंतर संगमनेर मधील आंदोलकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला. यावेळी प्रचंड घोषणाबाजी झाली. याचबरोबर आंदोलन स्थळी कार्यकर्ते अधिक आक्रमक झाले.

# मुळाकाठ परिसरात भक्तीचा जागर



**जनता आवाज वृत्तसेवा**
**करजगाव** : नेवासा तालुक्यातील करजगाव, पानेगाव, अंमळनेर, निंभारी, गोणेगाव, लांडेवाडीसह मुळाकाठ परिसर ज्ञानोबा माऊली तुकारामच्या जयघोषाने दुमदुमून गेला.

कामिका एकादशीनिमित्त नेवासा येथील पवित्र पैस खांबाच्या दर्शनासाठी परिसरातून अनेक दिंड्या रवाना झाल्या. या दिंड्यांचे पानेगाव, करजगाव, अंमळनेर, निंभारी व गोणेगाव येथील ग्रामस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले. वारकऱ्यांसाठी चहा, खिचडी, केळी तसेच उपवासाचे पदार्थ देण्यात आले.

गोणेगाव येथील रामकृष्ण आश्रमाची दिंडी भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली. या दिंडीत वारकरी शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. टाळ-मृदंगाचा गजर, अभंग-भजन आणि ज्ञानोबा माऊली तुकारामच्या जयघोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

# एसबीआय लाईफकडून खोसेंचा गौरव



**जनता आवाज वृत्तसेवा**
**पारनेर** : एसबीआय लाईफ इन्शुरन्स कंपनीमध्ये जून व जुलै २०२६ या सलग दोन महिन्यांत उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल लाईफ मित्र तथा पत्रकार निलम खोसे यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

एसबीआय लाईफचे डिव्हीजनल मॅनेजर विक्रांत राठोड यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी सिनियर बिझनेस मॅनेजर रविंद्र रोकडे, सुरेश खोसे उपस्थित होते.

एसबीआय लाईफच्या माध्यमातून ग्राहकांना विमा संरक्षण, आर्थिक सुरक्षितता आणि भविष्यकालीन आर्थिक नियोजनाबाबत सातत्याने योग्य मार्गदर्शन करत नवीन व्यवसाय उभारण्यात निलम खोसे यांनी उल्लेखनीय यश मिळविले आहे. जून आणि जुलै या दोन महिन्यांत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत कंपनीच्या अपेक्षा पूर्ण केल्या. त्यांच्या प्रामाणिकपणा, ग्राहकाभिमुख सेवा आणि सातत्यपूर्ण परिश्रमाची दखल घेत कंपनीच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# जिल्हा बँकेच्या मतदार यादीची छाननी अंतिम टप्प्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**
**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून मतदार यादीच्या मान्यता व दुरुस्तीच्या प्रक्रियेसाठी नगर ते नाशिक असा प्रशासकीय प्रवास सुरू होता. आता आवश्यक दुरुस्त्या पूर्ण झाल्याने येत्या आठवड्यात, म्हणजेच १५ ऑगस्टपर्यंत प्रारूप मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध होण्याची शक्यता सहकार विभागाच्या सूत्रांनी व्यक्त केली आहे.



जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांकडून प्राप्त झालेल्या ठरावांच्या आधारे जिल्हा बँकेने ५ हजार ८९० मतदारांची प्राथमिक यादी तयार करून नगर येथील सहकार विभागाच्या जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे सादर केली होती. त्यानंतर जिल्हा पातळीवर यादीची छाननी करून ती विभागीय सहनिबंधक तथा निवडणूक निर्णय अधिकारी, नाशिक यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली.

सहकार विभागाने या यादीची काटेकोर पडताळणी केली आहे. कार्यरत सहकारी संस्थांची नावे कायम ठेवण्यात आली असून अकार्यक्षम, बंद पडलेल्या तसेच नोंदणी रद्द झालेल्या संस्थांची नावे वगळण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीतील मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात घटून सुमारे ३ हजार ७०० पर्यंत येण्याची शक्यता आहे.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे सभासद संस्थांना ठराव पाठविण्यासाठी १६ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली होती. प्राप्त ठरावांची तालुकानिहाय यादी तयार करून ती नाशिक येथील कार्यालयात सादर करण्यात आली. मात्र, तेथे काही तांत्रिक आक्षेप नोंदविण्यात आल्याने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून यादी पुन्हा नगरला पाठविण्यात आली. नगर येथील यंत्रणेने त्रुटी दूर करून सुधारित यादी पुन्हा नाशिक कार्यालयाकडे पाठविली आहे. त्यामुळे १५ ऑगस्टपर्यंत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर हरकती व सूचना मागविण्यात येतील. त्यानंतर संबंधित हरकतींवर सुनावणी घेऊन अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेला साधारण महिनाभराचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

### निवडणूक पुढे ढकलण्याची शक्यता

दरम्यान, अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर जिल्हा बँकेच्या निवडणूक प्रक्रियेला वेग येणार आहे. साधारणपणे १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबरदरम्यान निवडणूक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, याच कालावधीत परतीच्या पावसाचा जोर वाढल्यास निवडणूक पुढे ढकलली जाण्याची शक्यता आहे.

# कामिका एकादशीनिमित्त खिचडीचे वाटप

## कामिका एकादशीला ज्ञानेश्वर मंदिरात भाविकांची अलोट गर्दी

**जनता आवाज वृत्तसेवा**
**नेवासा** : कामिका एकादशीनिमित्त नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या वतीने खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. एकादशीनिमित्त मंदिरात भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. दर्शन घेतल्यानंतर भाविकांनी खिचडी प्रसादाचा लाभ घेतला.



यावेळी श्री ज्ञानेश्वर देवस्थानचे महंत वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के, महंत प्रकाशानंदगिरी महाराज, देवस्थानचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग, विश्वस्त विश्वासराव गडाख, कैलासराव जाधव, मुळा कारखान्याचे चेअरमन भाऊसाहेब मोटे, व्हाईस चेअरमन बाळासाहेब पाटील, लक्ष्मणराव जगताप, संतोष फिरोदिया, अशोकराव नांगरे, मच्छिंद्र कडू, राजेंद्र सानप, त्रिंबक सुकाळकर, दिनकर घावटे, जालु गवळी, विशाल सुरडे, कैलास काळे, बाबासाहेब मोरे, संभाजी धोत्रे, स्वप्नील मापारी, भरत काळे, पांडुरंग निपुंगे, कैलास झगरे, डॉ. राहुल चव्हाण, राजेंद्र काळे, भीमाशंकर वरखडे, महादेव तांदळे, महादेव गडाख, बबनराव नागोडे, लालचंद मते, असिफ पठाण, वसंत टेकाळे, सुनील झीने, बाळासाहेब नवले, महंमद आतार, पत्रकार विजय गांधी, बंडू नेहे, अनिल वाघ, वैभव थिटे, बाळासाहेब कोकणे, बाळासाहेब मारकळी आदी उपस्थित होते.

श्री ज्ञानेश्वर देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी आशिष कावरे यांच्यासह देवस्थानचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. कामिका एकादशीनिमित्त भाविकांना खिचडी प्रसादाचे वाटप करून श्रद्धा, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

# नान्नज बंदला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रलंबित मागण्यांसाठी उपोषणाला पाठिंबा; अन्यथा रास्ता रोकोचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**
**जामखेड** : जामखेड तालुक्यातील नान्नज येथे बसस्थानकासह विविध प्रलंबित नागरी प्रश्नांच्या मागणीसाठी शहाजी राजेभोसले यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी ग्रामस्थ व व्यापाऱ्यांनी गाव कडकडीत बंद ठेवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. व्यापाऱ्यांनी शंभर टक्के दुकाने बंद ठेवत उपोषणस्थळी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला. गावकऱ्यांची एकजूट हीच आपली ताकद असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.




नान्नज गावाला अनेक वर्षांपासून भेडसावणाऱ्या बसस्थानक, बँक, रस्ते आणि पाणी यांसारख्या मूलभूत समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या मागण्या कोणत्याही एका पक्षाच्या किंवा व्यक्तीच्या हितासाठी नसून नान्नज शहर व परिसरातील नागरिक, महिला, मुली आणि विद्यार्थिनींच्या भविष्यासाठी आहेत, अशी भूमिका ग्रामस्थांनी व्यक्त केली.

नागरी सुविधांचा अभाव आणि रस्त्यांची झालेली दुरवस्था यामुळे परिसराच्या विकासाला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे नान्नज येथे पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहांसह सुसज्ज बसस्थानक उभारावे. तसेच शेतकरी, लहान व्यापारी, वृद्ध आणि तरुणांच्या सोयीसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा बँक ऑफ महाराष्ट्रसारख्या राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा सुरू करावी, अशी प्रमुख मागणी उपोषणकर्ते शहाजी राजेभोसले यांनी केली आहे. गाव बंदच्या काळात अत्यावश्यक सेवा, वैद्यकीय सेवा, औषधांची दुकाने आणि दूध विक्री सुरू ठेवण्यात आली होती. इतर सर्व व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दिला.

# गरजूंना केलेले दानच खरे पुण्य : प्रकाशानंदगिरी

**जनता आवाज वृत्तसेवा**
**नेवासा** : विवाह सोहळ्यातील डीजेचा दणदणाट आणि रस्त्यावर पडलेले सत्कारांचे फेटे पाहिले की खूप वाइट वाटते. समाजाला त्रासदायक खर्च करण्यापेक्षा जिथे गरज आहे तिथे दान केले की खरे पुण्य मिळते. आज पैशाची कमी नाही. संपत्ती खूप झालेली आहे, मात्र आज संपत्तीची नाही तर चांगल्या संस्कारांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन श्रीक्षेत्र देवगडचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज



यांनी केले.

दि. ८ ऑगस्ट रोजी नजन परिवाराकडून स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते या संकल्पची पूर्ती करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील उद्योजक बापूसाहेब नजन यांनी त्यांच्या कन्याचे विवाहप्रसंगी सत्कार समारंभाला फाटा देवून त्या खर्चात १११ वृक्षांची लागवड करणे, नागेबाबा परिवाराच्या अन्नपूर्णा योजनेस आर्थिक मदत करणे व फर्नीचर मॉलमधील कर्मचाऱ्याचा प्रत्येकी १० लाख रूपयांचा अपघाती विमा पॉलिशी घेण्याचा संकल्प केला होता.

> भेंडा ही ज्ञानेश्वर माऊलींच्या आणि नागेबाबा या सत्पुरुष यांच्या पदस्पर्शने पावन झालेली भूमि आहे. समाजाशी नाळ जोडलेले हे नजन कुटुंब आहे. समाजाला दूषण लागणाऱ्या गोष्टी बंद करण्याचा प्रयत्न कौतुकास्पद आहे, समाजाला दिशादर्शक काम आहे.
> **– पांडुरंग अभंग, माजी आमदार**

नेवासा येथील श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग, नागेबाबा संस्थांनचे अंकुश महाराज कादे, ज्येष्ठ नेते काशिनाथ नवले पाटील, अशोकराव मिसाळ, दत्तात्रय काळे, तुकाराम मिसाळ, सुखदेव फुलारी, मारुतराव नजन, मुख्याध्यापक कैलास धानापुणे, बाबासाहेब नजन, शिवाजीराव तागड, देवीदास गव्हाणे, आबासाहेब काळे, रामकृष्ण नवले, दादासाहेब गजरे आदी उपस्थित होते.

# राठोडांच्या पुण्यस्मरणार्थ रुग्णांना फळवाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**
**पाथर्डी** : अहिल्यानगर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार, शिवसेनेचे उपनेते तथा माजी मंत्री स्व. अनिल राठोड यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयात शिवसेना ठाकरे पक्षाच्या वतीने रुग्णांना फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले.



यावेळी स्व. राठोड यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यकर्त्यांप्रती असलेले त्यांचे प्रेम, सर्वांना समान न्याय देण्याची भूमिका तसेच शिवसेना संघटनेच्या उभारणीसाठी त्यांनी दिलेले योगदान यांचा उपस्थितांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

राठोड यांच्या आठवणींना उजाळा देताना अनेक शिवसैनिकांसह समविचारी पक्षांच्या कार्यकर्त्यांना भावना अनावर झाल्या. सामाजिक बांधिलकी जपत पुण्यस्मरण दिनानिमित्त रुग्णांना फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमास उपजिल्हा रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. मनीषा खेडकर, शिवसेना नेते विष्णुपंत पवार, नवनाथ चव्हाण, नंदकुमार डाळिंबकर, नवनाथ वाघ, सचिन नागापुरे, संघटक संतोष मेघुंडे, काँग्रेस तालुकाध्यक्ष नासिर शेख, प्रा. सुनील पाखरे, बाळासाहेब कांबळे, राहुल पालवे, मंगेश राठोड, धनंजय शेळके आदी उपस्थित होते.

# गोदड महाराजांच्या रथयात्रेत भक्तीचा महासागर

## पहिल्याच दिवशी दोन लाख भाविकांची उपस्थिती; धाकटी पंढरी कर्जतनगरी दुमदुमली

**जनता आवाज वृत्तसेवा**
**कर्जत** : धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या कर्जतनगरीत सद्गुरू गोदड महाराजांची रथयात्रा भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात सुरू झाली. पहिल्याच दिवशी तब्बल दोन लाख भाविकांनी गोदड महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतल्याने संपूर्ण कर्जत नगरी वारकरी, भाविक आणि भक्तांच्या गर्दीने फुलून गेली.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेमध्ये सद्गुरू गोदड महाराजांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पांडुरंगाने एकादशीचा मान



दिलेले महाराष्ट्रातील एकमेव संत म्हणून गोदड महाराजांची श्रद्धास्थान अशी ओळख आहे. आषाढी एकादशीनंतर पंधरा दिवसांनी येणाऱ्या कामिका एकादशीच्या दिवशी साक्षात पांडुरंग कर्जत नगरीत येतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. याच श्रद्धेतून रथयात्रेच्या दिवशी कर्जतला जणू पंढरीचे स्वरूप प्राप्त होते.

पुष्पवृष्टी आणि जयघोषात मंदिरापासून भव्य लाकडी रथ ओढण्यास सुरुवात झाली. हजारो वारकऱ्यांनी रथाच्या दोऱ्याला हात लावत गोदडनाथ महाराज की जय आणि पांडुरंग हरी असा जयघोष केला. हा रथ ओढणे अत्यंत पवित्र मानले जात असल्याने भाविकांमध्ये रथाला हात लावण्यासाठी मोठी उत्सुकता पाहायला मिळाली.

रथयात्रेच्या निमित्ताने पहाटेपासूनच गोदड महाराजांच्या समाधी मंदिरात दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दुपारी बाराच्या सुमारास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह भाविकांनी गोदड महाराजांच्या समाधीचे अभिषेकपूजन केले. यानंतर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली.

कर्जत पोलीस विभागाचा मानाचा ध्वज समाधी मंदिरात नेण्याची शेकडो वर्षांची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली. पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांच्या उपस्थितीत पोलीस पथकाने वाजत-गाजत हा मानाचा ध्वज समाधी मंदिरात नेला आहे.

### आ. पवारांकडून फराळाची व्यवस्था

आ. रोहित पवार आजारी असल्यामुळे यावेळी गोदड महाराजांच्या दर्शनासाठी उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र, सालाबादप्रमाणे त्यांच्या वतीने रथयात्रेसाठी येणाऱ्या हजारो भाविकांसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

# सोनईत रक्तदानातून मानवतेचा संदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**
**सोनई** : संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या वतीने आणि सोनई शाखेचे मुखी विठ्ठल महाराज खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १२४ साधक व भक्तगणांनी रक्तदान केले. सालाबादप्रमाणे आयोजित या उपक्रमाला पंचक्रोशीतील नागरिकांसह माका, देडगाव, कुकाणा, शेवगाव आदी गावांतील युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन मुळा बँकेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब निमसे आणि ओमशांती केंद्राच्या उषादिदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबासाहेब शिरसाठ, शिवाशेठ बाफणा, आनंदवन संस्थेचे उपाध्यक्ष विनायक दरंदले, सचिव संजय गर्जे, डॉ. रामनाथ बडे, बाळासाहेब ढाले आदी उपस्थित होते. उपक्रमास माजी अर्थ व पशुसंवर्धन सभापती सुनील गडाख, मारुती मित्र मंडळाचे ज्येष्ठ सदस्य, उदय पालवे आणि एस. बी. शेटे यांनी भेट देऊन आयोजकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी निरंकारी मंडळाचे प्रमुख विठ्ठल महाराज खाडे यांनी शिबिराच्या आयोजनामागील उद्देश व उपक्रमाची माहिती दिली.

# गुन्हेगारांचा वाढता वचक की कायद्याची घटती भीती?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील दोन हत्याश्रीराम पूरमधील हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैय्या यांची आणि अहिल्यानगर शहरातील म हापालिका कर्मचारी धीरज परदेशी यांचीया केवळ दोन गुन्हेगारी घटना म्हणून पाहून चालणार नाही. त्या समाजाच्या मनात घर करू लागलेल्या असुरक्षिततेच्या भावनेचे प्रतिबिंब आहेत. गुन्हा घडतो, आरोपी अटक होतात, तपास सुरू होतो आणि काही दिवसांनी विषय मागे पडतो; पण नागरिकांच्या मनात उरतो तो एकच प्रश्न''आपण खरोखर सुरक्षित आहोत का?''

अहिल्यानगर हा सहकार, शिक्षण आणि सामाजिक चळवळींचा जिल्हा म्हणून राज्यात ओळखला जातो. विकासाची अनेक मॉडेल्स या जिल्ह्याने महाराष्ट्राला दिली. मात्र, गेल्या काही वर्षांत गुन्हेगारीच्या स्वरूपात झालेला बदल चिंताजनक आहे. किरकोळ वाद असो वा आर्थिक व्यवहार, वैयक्तिक वैमनस्य असो वा टोळी संस्कृतीअनेक प्रसंगी हिंसा हा पहिला पर्याय बनत चालल्याचे चित्र दिसते. हा बदल केवळ पोलिसांसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी धोक्याची घंटा आहे.

श्रीरामपूरमध्ये आकाश दुबैय्या यांच्या हत्येनंतर व्यापारी वर्ग रस्त्यावर उतरला. व्यापाऱ्यांच्या रोषामागे केवळ एका व्यावसायिकाचा मृत्यू नव्हता; तर शहरात वाढत्या गुंडगिरीबद्दलची भीती होती. त्यानंतर धीरज परदेशी यांच्या मृत्यूने ही भीती आणखी गडद झाली. शासकीय कर्मचारीही सुरक्षित नाहीत, अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण होणे कोणत्याही प्रशासनासाठी धोक्याचा इशारा आहे.

याचा अर्थ असा नाही की पोलिस यंत्रणा निष्क्रिय आहे. जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलीस विविध कारवाया करीत आहेत. अमली पदार्थांची जप्ती, सराईत गुन्हेगारांवरील प्रतिबंधात्मक कारवाया, तडीपार, अवैध शस्त्रसाठ्यांवर धाडी आणि अनेक गुन्ह्यांचा उलगडा सातत्याने होत आहे. परंतु प्रश्न कारवायांच्या संख्येचा नसून त्यांच्या प्रतिबंधात्मक परिणामाचा आहे. गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा धाक निर्माण होतो आहे का, हा खरा मुद्दा आहे.




कायदा-सुव्यवस्था ही केवळ पोलिसांची जबाबदारी मानण्याची सवयही बदलावी लागेल. समाजातील वाढती व्यसनाधीनता, बेरोजगारी, टोळी संस्कृतीचे आकर्षण, सोशल मीडियातून वाढणारे संघर्ष आणि किरकोळ वादांचे हिंसक रूपांतर या सर्व घटकांचा विचार करावा लागेल. गुन्हेगार तयार होतात ते केवळ अंधाऱ्या गल्लीबोळांत नाहीत; ते समाजातील दुर्लक्षित प्रश्नांच्या सावलीतही तयार होतात.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तीन पातळ्यांवर काम करण्याची गरज आहे. प्रथम, संवेदनशील भागांत प्रभावी गस्त, तांत्रिक देखरेख आणि गुप्त माहिती संकलन अधिक सक्षम करणे. दुसरे, गंभीर गुन्ह्यांच्या तपासात वेग आणि न्यायालयीन प्रक्रियेत परिणामकारक पाठपुरावा करून दोषींना शिक्षा होईल, असा विश्वास निर्माण करणे. आणि तिसरे, युवकांना गुन्हेगारीच्या वाटेवर जाण्यापासून रोखण्यासाठी सामाजिक आणि शैक्षणिक हस्तक्षेप वाढवणे.

अहिल्यानगरच्या अलीकडील घटना एक व्यापक वास्तव अधोरेखित करतातगुन्हेगारीचा सामना केवळ प्रतिक्रियात्मक पद्धतीने करून चालणार नाही. गुन्हा घडल्यानंतर आरोपींना अटक करणे आवश्यकच; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे गुन्हा घडूच नये, अशी परिस्थिती निर्माण करणे. त्यासाठी पोलिस, प्रशासन, लोकप्रतिनिधी, न्यायव्यवस्था आणि समाज यांच्यात अधिक प्रभावी समन्वय आवश्यक आहे.

लोकशाहीत नागरिकांना विकासाइतकाच सुरक्षिततेचाही अधिकार आहे. शहरातील रस्त्यावर, बाजारपेठेत किंवा आपल्या कार्यस्थळी निर्भयपणे वावरण्याचा विश्वास जर डळमळीत झाला, तर विकासाची सर्व समीकरणे अपुरी ठरतात. त्यामुळे आकाश दुबैय्या आणि धीरज परदेशी यांच्या हत्यांचा तपास हा केवळ दोन गुन्ह्यांचा तपास राहू नये; तो अहिल्यानगरमधील कायदा-सुव्यवस्थेवरील जनविश्वास पुनर्स्थापित करण्याची संधी ठरली पाहिजे. कारण शेवटी प्रश्न केवळ आरोपींना शिक्षा होण्याचा नाही; तर कायद्याची भीती गुन्हेगारांच्या मनात आणि कायद्यावरील विश्वास नागरिकांच्या मनात कायम राहण्याचा आहे.

## एक्झलंट ऑलिंपियाडमध्ये डॅफोडील्स स्कूलची राज्यभर चमक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लिंपणगाव :** एक्झलंट ऑलिंपियाड फाउंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय परीक्षेत श्रीगोंदा येथील तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे. राज्य गुणवत्ता यादीत तीन विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

राज्य गुणवत्ता यादीत इयत्ता पहिलीतील ओवी अमोल नागवडे हिने १९२ गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. इयत्ता दुसरीतील मनस्वी मनोज साखरे व शंभूराज प्रविण जामदार यांनी प्रत्येकी १९८ गुण मिळवत राज्यात संयुक्त प्रथम क्रमांक पटकावला. याच वर्गातील स्वरूप गोरख कोथिंबिरे याने १९४ गुणांसह तिसरा, तर ज्ञानेश्वरी राहुल जामदार हिने १९२ गुणांसह चौथा क्रमांक मिळविला. इयत्ता तिसरीतील प्रसन्ना सूर्यभान गोलांडे हिने १८८ गुणांसह राज्यात तिसरा क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, विश्वस्त अनुराधाताई नागवडे, मुख्याध्यापिका नीतू दुलानी, शिक्षक, पालक आणि शाळा व्यवस्थापनाने त्यांचे अभिनंदन केले.

''विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे त्यांच्या परिश्रमाबरोबरच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्याचे फलित आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न अशाच प्रकारे कायम राहील,'' असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी केले. या यशामुळे डॅफोडील्स स्कूलच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले असून, परिसरातून यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## स्वातंत्र्यलढ्यातील वीरांगनांचा इतिहास भित्तिपत्रकातून उलगडला

### महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचा उपक्रम; बबनराव पाचपुते यांच्या हस्ते उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लिंपणगाव :** क्रांतिदिन आणि स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा येथील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे 'भारतातील अग्निशिखा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महिलांचा सहभाग' या विषयावरील माहितीपूर्ण भित्तिपत्रक साकारण्यात आले. या भित्तिपत्रकाचे उद्घाटन माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी माजी आमदार राहुल जगताप, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य महावीर पटवा तसेच प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात महिलांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाची माहिती मिळावी, त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत व्हावी आणि स्वातंत्र्यलढ्यातील वीरांगनांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. भित्तिपत्रकात राणी लक्ष्मीबाई, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, कॅप्टन लक्ष्मी सहगल, मातंगिनी हाजरा, अरुणा आसफ अली आणि उषा मेहता यांच्या कार्याची माहिती आकर्षक पद्धतीने सादर करण्यात आली. या उपक्रमाचे आयोजन इतिहास विभागप्रमुख प्रा. रमेश थोरात आणि प्रा. डॉ. सुप्रिया पवार यांनी केले. उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ व डॉ. नितीन थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच ज्युनिअर विभागाच्या जगताप मॅडम आणि सीनियर विभागाच्या डॉ. अर्चना फुलारी यांनी सहकार्य केले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भित्तिपत्रकाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करणारा हा उपक्रम ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## ओव्हरलोड वाहतुकीवर कारवाईची मागणी आरटीओला १५ दिवसांचा अल्टिमेटम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात सुरू असलेल्या ओव्हरलोड मालवाहतुकीवर तातडीने कठोर कारवाई करावी, अन्यथा प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा युवा स्वाभिमान पक्षाने दिला आहे. यासंदर्भातील निवेदन प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर क्षमतेपेक्षा अधिक माल वाहून नेणारी वाहने खुलेआम धावत आहेत. या वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढत असून, शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेले रस्ते व पूलही खराब होत आहेत. मोटार वाहन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करून सुरू असलेल्या या वाहतुकीकडे संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. जिल्ह्यातील प्रमुख रस्ते व महामार्गांवर विशेष तपासणी मोहीम राबवून ओव्हरलोड वाहनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## श्रीरामपुरात जागतिक आदिवासी दिन उत्साहात

### आदिवासी कोळी महादेव समाज संघटनेतर्फे विविध उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** आंतरराष्ट्रीय आदिवासी दिनानिमित्त आदिवासी कोळी महादेव समाज संघटना, श्रीरामपूरच्या वतीने जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. समाजाच्या सांस्कृतिक परंपरा, अस्मिता आणि ऐक्याचा जागर करत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

वार्ड क्रमांक ४, चाटुफळे मार्ग, पराग प्लाझा, बाजार रोड येथील आदिवासी कोळी महादेव समाज संघटनेच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाला ज्येष्ठ मार्गदर्शक जगन्नाथ लंगोटे, बाळासाहेब काशिद, विजय आगलावे, राजू गायकवाड, गोरखनाथ दौंडे, सोमनाथ पांजरे, माजी नगरसेवक सुधीर वायखिंडे, सनी लंगोटे, गजेंद्र मेढे, विलास घाणे, पद्मनाथ वाघमारे, अनिकेत लंगोटे, मधुरा लंगोटे, किशोर लंगोटे, मच्छिंद्रनाथ वाघमारे, भरत शेंगाळ, राज बानेदार, शिवाजी



सरपते, मच्छिंद्र दौंडे, बजरंग दौंडे आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आदिवासी समाजाचा इतिहास, संस्कृती आणि परंपरा जपण्याबरोबरच शिक्षण, संघटन आणि सामाजिक प्रगतीसाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. समाजातील तरुणांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधून समाजाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. कार्यक्रमास समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, सामाजिक ऐक्य आणि स्वाभिमानाचा संदेश देत जागतिक आदिवासी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

## पंढरपूरच्या अप्पर पोलिस अधीक्षकपदी प्रेरणा शिंदे

### मढेवडगावच्या कन्येच्या नियुक्तीने श्रीगोंदा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लिंपणगाव :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या पावन श्रीक्षेत्र पंढरपूर येथे अपर पोलिस अधीक्षकपदी प्रेरणा सुजय शिंदे (कट्टे) यांची नियुक्ती झाली आहे. या नियुक्तीमुळे मढेवडगावसह श्रीगोंदा तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रेरणा शिंदे या मढेवडगाव येथील प्रगतिशील शेतकरी व शासकीय कंत्राटदार डी. व्ही. शिंदे आणि सुजाता शिंदे यांच्या सुनबाई आहेत. त्यांचे पती सुजय दत्तात्रय शिंदे हे नवी मुंबई येथे राज्य कर विभागात सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. प्रशासनातील दोन महत्त्वाच्या विभागांत कार्यरत असलेल्या या दाम्पत्याने आपल्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण केली आहे.

प्रेरणा शिंदे यांनी सातारा येथे उपविभागीय पोलिस अधिकारी, कोल्हापूर येथे पोलिस प्रशासन, पिंपरी-चिंचवड तसेच मुंबईतील आझाद मैदान येथे सहायक पोलिस आयुक्त म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. नवी मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या प्रमुख म्हणून काम करताना त्या तेथील पहिल्या महिला पोलिस उपअधीक्षक (गुन्हे शाखा) ठरल्या होत्या.



ग्रामीण भागातून पुढे येत जिद्द, परिश्रम आणि गुणवत्तेच्या जोरावर त्यांनी पोलिस सेवेत यशस्वी वाटचाल केली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील तरुणींना त्यांचा प्रवास प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

श्रीक्षेत्र पंढरपूरसारख्या संवेदनशील धार्मिक क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी त्या सक्षमपणे पार पाडतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, त्यांच्या नियुक्तीबद्दल मढेवडगावचे लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे, उपसरपंच सुनिता उंडे, ग्राम पंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रसाद साखर कारखान्यातील चोरीचा २४ तासांत उलगडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** वांबोरी येथील प्रसाद साखर कारखान्यातून चोरीस गेलेल्या पितळी बुश प्रकरणाचा अवघ्या २४ तासांत उलगडा करण्यात राहुरी पोलिसांना यश आले. श्रीरामपूर शहर पोलिसांच्या मदतीने तीन फरार आरोपींना अटक करण्यात आली असून चोरीस गेलेला शंभर टक्के मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे.

याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८७२/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल आहे. फिर्यादी बबन सिताराम पागिरे (रा. वांबोरी, ता. राहुरी) यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत फरार आरोपींचा शोध सुरू केला.

तपासादरम्यान श्रीरामपूर शहर पोलिसांनी दिलेल्या गोपनीय माहितीच्या आधारे श्रीरामपूर शहर परिसरात छापा



टाकून सोएफ युनूस शहा, कैसर निसार शेख आणि मुत्तबिर युसुफ शहा (सर्व रा. श्रीरामपूर) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपींकडून चोरीस गेलेले पितळी बुश जप्त करण्यात आले. त्यामुळे या गुन्ह्यातील चोरीचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर आणि पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलिस हेड कॉन्स्टेबल अशोक झिने, संजय राठोड, पोलिस शिपाई सतीश कुऱ्हाडे, प्रमोद ढाकणे, नदीम शेख यांनी सहभाग घेतला. तसेच श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्याचे हवालदार मनोज गोसावी, पोलिस कॉन्स्टेबल संपत बडे, भारत तमनर, नंदू लोखंडे, आकाश वाघमारे, जालिंदर माने आणि होमगार्ड महेश थोरात यांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी महत्त्वाची गोपनीय माहिती व सहकार्य पुरविले. पुढील तपास राहुरी पोलिस करीत आहेत.

## भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव श्रीरामपूरकरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर :** शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. शहरातील मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठा, शाळा, महाविद्यालये, दवाखाने आणि रहिवासी भागांत भटक्या कुत्र्यांचे कळप मुक्तपणे फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर नगरपरिषद प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जिजामाता तरुण मंडळाने निवेदनाद्वारे केली आहे.

मंडळाच्या निवेदनानुसार, विशेषतः रात्रीच्या वेळी भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वाहनांच्या मागे धावणे, पादचाऱ्यांचा पाठलाग करणे आणि अचानक रस्त्यावर येणे, यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी आणि दुचाकीस्वारांना या समस्येचा सर्वाधिक फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, आसपासच्या गावांमधून भटके कुत्रे पकडून श्रीरामपूर शहरात

**जिजामाता तरुण मंडळाचे नगरपरिषदेला निवेदन**

आणून सोडले जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. या प्रकाराची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही मंडळाने केली आहे. भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण आणि पुनर्वसनाची मोहीम तातडीने राबविण्यासह शहरातील संवेदनशील भागांत विशेष पथके नियुक्त करावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होण्यापूर्वी प्रशासनाने या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, असेही मंडळाने म्हटले आहे.

भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढत असून, नगरपरिषद प्रशासन या प्रश्नावर किती तत्परतेने कार्यवाही करते, याकडे श्रीरामपूरकरांचे लक्ष लागले आहे.

## अखेर नगरपरिषद रुग्णालयात श्वानदंश, टीटी लसी उपलब्ध

**जनता आवाज वृत्तसेवा**




**श्रीरामपूर :** अनेक महिन्यांपासून श्वानदंश (अँटी-रेबीज) आणि टिटॅनस (टीटी) लसींच्या तुटवड्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय अखेर दूर झाली आहे. श्रीरामपूर नगरपरिषदेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात या दोन्ही लसींचा पुरवठा करण्यात आला असून, नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगरपरिषदेने केले आहे.

लसी उपलब्ध नसल्याने श्वानदंश झालेल्या रुग्णांना उपचारासाठी सुमारे पाच किलोमीटर अंतरावरील शिरसगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात जावे लागत होते. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत होती. हा प्रश्न नगरपरिषदेचे आरोग्य सभापती दिपक वमने यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नागरगोजे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला.

या विषयाची माहिती नगराध्यक्ष करण ससाणे आणि आमदार हेमंत ओगले यांनाही देण्यात आली. त्यांनीही जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधून लसींचा तातडीने पुरवठा करण्याची मागणी केली. त्यानंतर जिल्हा आरोग्य विभागाने नगरपरिषदेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राला श्वानदंश आणि टीटी लसी उपलब्ध करून दिल्या. यामुळे शहरातील नागरिकांना आता उपचारासाठी बाहेर जाण्याची गरज राहणार नसून, नगरपरिषदेच्या दवाखान्यातच आवश्यक लसीकरणाची सुविधा उपलब्ध झाली आहे. नगराध्यक्ष करण ससाणे आणि आरोग्य सभापती दिपक वमने यांनी शहरातील नागरिकांना उपलब्ध सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. नगरपरिषदेच्या आरोग्य सेवांमध्ये ही महत्त्वाची भर ठरणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## माका येथील घरफोडीचा उलगडा

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, एक आरोपी जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** तालुक्यातील माका येथे झालेल्या घरफोडीचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणातील एका आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्या दोन साथीदारांचा पोलिस शोध घेत आहेत. आरोपीने चोरीतील १० तोळे सोन्याचे दागिने पैठण येथील एका सोनाराला विकल्याची कबुली दिली आहे.



याप्रकरणी अभिषेक साहेबराव आखाडे (रा. आखाडे वस्ती, माका, ता. नेवासा) यांच्या फिर्यादीवरून सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. २३ जुलै रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी घराची खिडकी उघडून कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली होती.

जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष पथक नियुक्त केले. गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने शेवगाव तालुक्यातील खानापूर परिसरातून दिनेश ऊर्फ राजा सखाराम काळे (रा. रहाटगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने अमोल बिरजू भोसले आणि काळू बिरजू भोसले यांच्या मदतीने मोटारसायकलवर येऊन माका येथे घरफोडी केल्याची कबुली दिली. तसेच चोरीतील सुमारे १० तोळे सोन्याचे दागिने पैठण येथील एका सोनाराला विकल्याचे, तर उर्वरित दागिने फरार आरोपीकडे असल्याचे सांगितले. अटक करण्यात आलेल्या आरोपीला पुढील तपासासाठी सोनई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक संदीप दरवडे तसेच पोलिस अंमलदार भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, अमोल कोतकर आणि भगवान धुळे यांनी केली.

दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर, मंगळवार, दि.११ ऑगस्ट २०२६, पान नं. ८

# डॉ. शरदचंद्रजी पवार पतसंस्थेची प्रगती कौतुकास्पद

## आ.आशुतोष काळे; सर्वसाधारण सभा संपन्न




जनता आवाज वृत्तसेवा

**कोळपेवाडी** : अर्थिक शिस्त पाळून पदमविभूषण डॉ.शरदचंद्रजी पवार सहकारी पतसंस्थेने केलेली प्रगती कौतुकास्पद आहे. सभासदांच्या हिताला सदैव प्राधान्य, पंधरा टक्के लाभांश देण्याचा निर्णय आणि ठेवीत झालेली बावीस टक्क्यांची वाढ या बाबी संस्थेच्या कामगीरीचे वैशिष्ट आहे, असे प्रतीपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले. कोळपेवाडी येथे, संस्थेच्या ३७ व्या वार्षिक सभेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी संस्थेचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे, संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र रोहमारे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रवीण शिंदे, संचालक दिलीपराव बोरनारे, सुधाकर रोहोम,सूर्यभान कोळपे, श्रीराम राजेभोसले, डॉ.मच्छिंद्र बर्डे, प्रशांत घुले, सुनील मांजरे उपस्थित होते. आ. काळे म्हणाले, या संस्थेने कर्मवीर शंकरराव काळे यांचा वारसा जपत सभासदांच्या विश्वासाला प्राधान्य दिले. संस्थेचा पारदर्शक कारभार,आर्थिक शिस्त, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्राहकाभिमुख सेवा यामुळे संस्थेची विश्वासार्हता वाढली. संस्थेकडे ५३.२४ कोटी रूपयांच्या ठेवी असून ४० कोटी ६८ लाख कर्ज वाटप केले आहे. ढोबळ एनपीए ३.५२ टक्के असून एनपीए च्या व्याज व मुद्दलासाठी ०८ कोटी ६३ लाख ८५ हजाराची गुंतवणूक केली आहे. शंभर टक्के तरतुदीमुळे निव्वळ एन.पी.ए. शुन्य टक्के आहे. १ कोटी १४ लाख ३० हजार रुपयांचा नफा झाला. ऑडीट वर्ग 'अ' आहे. सभेच्या अध्यक्षपदाची सुचना राजेंद्र ढोमसे यांनी मांडली त्यास अशोक भगत यांनी अनुमोदन दिले. अहवाल वाचन संस्थेचे मुख्य व्यवस्थापक मंगेश देशमुख यांनी केले.

विषय पत्रिकेवरील सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. याप्रसंगी शरद पवार पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, व्हाईस चेअरमन रावसाहेब चौधरी, गौतम सहकारी कुक्कुट पालनचे चेअरमन विजय कुलकर्णी, बँकेचे सर्व संचालक मंडळ व व्यवस्थापन मंडळ सदस्य, गौतम बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण पावडे, प्रशासकीय अधिकारी बापूसाहेब घेमुड, कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ ,मुख्य व्यवस्थापक मंगेश देशमुख, गौतम सहकारी कुक्कुट पालनचे मॅनेजर सुरेश पेटकर, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्टचे कार्यकारी संचालक दौलतराव मोरे, आदी मान्यवर उपस्थित होते. पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे यांनी आभार मानले.

*रिझर्व बँकेने नवीन लायसन्स देण्याचे जाहीर केले आहे. पदमविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार सहकारी पतसंस्था,सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नियमांचे व वसुलीचे काटेकोरपणे पालन करून पारदर्शक कारभार करत आहे. त्यामुळे या संस्थेच्या दृष्टीने भविष्यात हि संधी आहे.*

**आमदार आशुतोष काळे.**

# पंपाची केबल चोरणारा गजाआड




जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीगोंदा** : तालुक्यातील कोळगाव शिवारातील पांढरेवाडी परिसरात शेतातील बोरवेल, विहीर व सोलर पंपाच्या कॉपर केबल चोरी करणाऱ्या आरोपीस बेलवंडी पोलिसांनी रंगेहात पकडून अटक केली. आरोपीकडून विविध शेतकऱ्यांच्या सुमारे ८० हजार रुपये किमतीच्या कॉपर केबल जप्त करण्यात आल्या आहेत. पांढरेवाडी (ता. श्रीगोंदा) येथील शेतकरी अनिल बापूराव मोरे हे ८ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे ४ वाजता कोळगाव शिवारातील गट क्रमांक ८० मधील लिंबोणीच्या शेतात काम करीत होते. त्यावेळी त्यांच्या ओळखीचा उमेश लायसन भोसले (रा. पांढरेवाडी, कोळगाव) हा बोरवेलची कॉपर केबल कापून चोरी करून पळून जात असताना मोरे यांच्या निदर्शनास आला. मोरे यांनी तातडीने त्याचा पाठलाग करून त्याला रंगेहात पकडले. दरम्यान, कोळगाव परिसरातील संजय शितोळे, संदीप बारवकर, गणपत बारवकर, विश्वास लगड, दादासाहेब लगड व राजेंद्र भोईट यांच्याही विहीर, बोरवेल व सोलर पंपाच्या कॉपर केबल चोरीला गेल्याचे तपासात समोर आले. बेलवंडी पोलिसांनी आरोपीस अटक करून पोलीस कोठडी घेतली. त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता विविध शेतकऱ्यांच्या चोरीस गेलेल्या सुमारे ८० हजार रुपये किमतीच्या केबल वायर जप्त करण्यात पोलिसांना यश आले. तसेच पिंपळगाव पिसा, विसापूर व खरातवाडी परिसरातील शेतकऱ्यांच्या केबल वायर चोरीबाबतही तक्रारी प्राप्त झाल्या असून, या चोरीच्या घटनांमध्ये आरोपीचा सहभाग आहे का, याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. कारवाईत पोलीस हवालदार धर्मराज दहिफळे, महिला पोलीस हवालदार लता पुराने, संदीप गवारे, भाऊसाहेब यमगर, पोलीस शिपाई दादा क्षीरसागर, विनोद पवार, राजू भोर तसेच होमगार्ड यांनी सहभाग घेतला.

# तंत्रज्ञानाच्या नव्या युगाशी विद्यार्थ्यांची ओळख

## समर्थ पॉलिटेक्निकमध्ये इंडक्शन प्रोग्रामला उत्स्फूर्त सुरुवात



जनता आवाज वृत्तसेवा

**बेल्हे** : अहिल्यानगर शहरातील बेल्हे येथील समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ पॉलीटेक्निक, बेल्हे येथे प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी चार दिवसीय इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समर्थ पॉलीटेक्निकचे प्राचार्य डॉ. अनिल कपिले होते. यावेळी त्यांनी नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पॉलिटेक्निक शिक्षणाचे महत्त्व, तांत्रिक शिक्षणातून उपलब्ध होणाऱ्या विविध करिअर संधी तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात कौशल्य विकसित करण्याची गरज याविषयी मार्गदर्शन केले. ''पॉलिटेक्निकचे शिक्षण हे केवळ पदविका मिळविण्यापुरते मर्यादित नसून उद्योगक्षेत्राच्या गरजा ओळखून कौशल्यपूर्ण करिअर घडविण्याची एक उत्तम संधी आहे,'' असे त्यांनी सांगितले. चार दिवसीय इंडक्शन प्रोग्राममध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध उपयुक्त व आधुनिक विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे. व्यक्तिमत्त्व विकास ज्ञानेश्वर धोमरे ड्रोन तंत्रज्ञान नितीन सोनावणे सायबर सुरक्षा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रथमेष थोरात ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग आणि त्रिमितीय मुद्रण सचिन शेलके रोबोटिक्स डॉ. रमेश पवार हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे. विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासासोबतच ड्रोन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, थ्री-डी प्रिंटिंग, ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग आणि रोबोटिक्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यात येणार आहे.

***या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत तसेच प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ईश्वर कोरडे यांनी केले, तर उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. शाम फुलपगारे यांनी मानले.***

# खोटी मृत्यूची बातमी प्रसारित

## दोन यूट्यूब न्यूज चॅनेलवर गुन्हा




जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर** : संवेदनशील गुन्ह्यातील जखमी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची खोटी आणि खातरजमा न केलेली बातमी प्रसारित करून शहरात भीतीचे वातावरण निर्माण केल्याप्रकरणी दोन यूट्यूब न्यूज चॅनेलविरुद्ध कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास २४ आणि या यूट्यूब चॅनेलवरील संबंधित बातमीदार व संपादकांनी कोणतीही खातरजमा न करता भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील जखमी धीरज कचरुसिंग परदेशी (रा. माधवबाग, भिंगार) यांचा मृत्यू झाल्याची बातमी प्रसारित केली. या बातमीमुळे अहिल्यानगर शहरात भीतीचे वातावरण निर्माण होण्याची तसेच सामाजिक शांतता बिघडण्याची शक्यता निर्माण झाल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७७५/२०२६ नोंदवून भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५३ (१), ३५३ (२) आणि २९२ अन्वये संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल रोहिणी दरंदले करीत आहेत. संवेदनशील घटनांबाबत कोणतीही माहिती प्रसिद्ध करण्यापूर्वी तिची खातरजमा करणे आवश्यक असून, चुकीच्या बातम्यांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# श्रीरामपूर गुन्हेगारीमुक्त करण्याची मागणी

## दुबैय्या कुटुंबाचे १५ ऑगस्टपासून धरणे आंदोलन

जनता आवाज वृतसेवा

**श्रीरामपूर** : हॉटेल व्यावसायिक आकाश चंद्रशेखर दुबैय्या यांच्या हत्येला महिनाभर उलटूनही संघटित गुन्हेगारीविरोधात अपेक्षित कारवाई झालेली नसल्याचा आरोप करत दुबैय्या कुटुंबाने १५ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. आरोपींसह त्यांच्या टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) अंतर्गत कारवाई करून खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा, अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे.

यासंदर्भात चंद्रशेखर नारायण व्यंकटराम (दुबैय्या) यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांना निवेदन दिले असून, १५ ऑगस्ट रोजी सकाळी १०.१० वाजता श्रीरामपूर येथील महात्मा गांधी पुतळ्यासमोर कुटुंबीयांसह बेमुदत धरणे आंदोलनास बसणार असल्याचे जाहीर केले आहे. मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषण, चक्री उपोषण, घेराव, रास्ता रोको आदी तीव्र आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

११ जुलै रोजी नेवासा रोडवरील हॉटेल लक्ष्मीनारायण येथे किरकोळ वादातून आकाश दुबैय्या यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेनंतर संपूर्ण श्रीरामपूर चार दिवस बंद राहिला होता. व्यापारी, वकील, शिक्षक, विद्यार्थी आणि विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी संघटित गुन्हेगारीविरोधात रस्त्यावर उतरून निषेध व्यक्त केला होता.

त्यावेळी पोलिस प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतरच अंत्यसंस्कार करण्यात आल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

# महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत पळवली

## चहा पिण्याचा केला बहाणा; पोलिसात गुन्हा

जनता आवाज वृत्तसेवा

**संगमनेर** : आश्वी परिसरात दिवसाढवळ्या घडलेल्या एका धक्कादायक घटनेत अज्ञात दोन भामट्यांनी एका ७० वर्षीय ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत हिसकावून पोबारा केल्याची घटना घडली आहे. आश्वी-प्रतापपूर रस्त्यावरील आंधळे पेट्रोल पंपाजवळ बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास ही घटना घडली असून, या धाडसी चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. प्रतापपूर येथील रहिवासी असलेल्या ७० वर्षीय शकुंतला गंगाधर चतुरे या आंधळे पेट्रोल पंपाजवळ चहाची टपरी चालवून आपला उदरनिर्वाह करतात. नेहमीप्रमाणे बुधवारी सायंकाळी ५:१५ वाजेच्या सुमारास त्या दुकानात असताना दोन अज्ञात इसम तेथे आले. त्यांनी चहा मागण्याच्या बहाण्याने शकुंतला यांच्याशी संवाद साधला. दुकानात आणि आसपास गर्दी नसल्याचा फायदा घेत या भामट्यांनी अचानक शकुंतला यांच्या गळ्यातील सुमारे ४० हजार रुपये किंमतीची व एक तोळा वजनाची सोन्याची पोत बळजबरीने हिसकावून घेतली. शकुंतला काही समजायच्या आतच चोरट्यांनी आपल्या दुचाकीवरून क्षणात पळ काढला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे भयभीत झालेल्या शकुंतला चतुरे यांनी आरडाओरड केली, मात्र तोपर्यंत चोरटे दूर निघून गेले होते. या घटनेनंतर घाबरलेल्या शकुंतला यांनी तातडीने पोलिसांत धाव घेऊन तक्रार नोंदवली.

# 'पैस' खांबाच्या चरणी लाखो भाविक लिन!

## 'ज्ञानोबा-माऊली'च्या गजरात नेवासे नगरी दुमदुमली!



जनता आवाज वृत्तसेवा

**नेवासा शहर** : ''आनंदाचे डोही आनंद तरंग'' असा असीम भक्तिभाव उराशी बाळगून कामिका एकादशीनिमित्त तीर्थक्षेत्र नेवासा येथे लाखो भाविकांचा जनसागर लोटला. महावैष्णव संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी असलेल्या या पावन भूमीत माऊलींच्या दिव्य 'पैस' खांबाचे दर्शन घेताना भाविक तल्लीन झाले. पंढरपूरची वारी पूर्ण करून आलेल्या वारकऱ्यांच्या दिंड्यांनी नेवासे नगरीत प्रवेश करताच टाळ-मृदंगाच्या गजराने अन् 'ज्ञानोबा-माऊली-तुकाराम'च्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला.

रविवारी (दि. ९ ऑगस्ट) पहाटे ३ वाजता संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख वेदांताचार्य हभप गुरुवर्य देविदासजी महाराज म्हस्के यांच्या हस्ते वेदमंत्रांच्या जयघोषात पवित्र 'पैस' खांबाची महापूजा संपन्न झाली. यावेळी मध्यमेश्वर देवस्थानचे बालयोगी महंत ऋषिनाथजी महाराज, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, देवस्थानचे विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे, मुख्य चोपदार गणेश महाराज आरगडे, हरी महाराज भोगे, राम महाराज खरवंडीकर, भगवान महाराज डिके, मयूर महाराज डौले, डॉ. संजय सुकाळकर, विश्वस्त कृष्णाभाऊ पिसोटे, गुंफाबाई पिसोटे, माऊली भक्त कृष्णाभाऊ खरड व शांताबाई खरड आदी उपस्थित होते.

पंढरपूरच्या पांडुरंगाच्या दर्शनानंतर माऊलींच्या दर्शनाने वारीची सांगता करण्यासाठी नेवासा, गंगापूर, राहुरी, श्रीरामपूर आणि शेवगाव परिसरातून आलेल्या शेकडो दिंड्यांनी मंदिर परिसर भक्तिमय केला. देवस्थानचे प्रमुख विश्वस्त हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री व अध्यक्ष माजी आमदार पांडुरंगजी अभंग यांच्यासह विश्वस्त मंडळाने दिंड्यांचे श्रीफळ व प्रसाद देऊन स्वागत केले.

या सोहळ्यात देवगड दत्त मंदिर संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, माजी आमदार संभाजीराव फाटके, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, विश्वासराव गडाख, कैलासराव जाधव, मुळाचे चेअरमन भाऊसाहेब मोटे, व्हाईस चेअरमन बाळासाहेब पाटील, किशोर गारुळे, लक्ष्मणराव जगताप, बाबासाहेब मोरे, संभाजी धोत्रे, स्वप्नील मापारी, महेश लोखंडे, संदीप सरकाळे आदी मान्यवरांनी दर्शन घेतले.

# डॉ. जयश्री थोरात यांच्याकडून तामकड्याचे जलपूजन

## पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र; सुरक्षीतता पाळण्याचे आवाहन



जनता आवाज वृत्तसेवा

**संगमनेर** : नाशिक पुणे महामार्गावर चंदनापुरी घाटामध्ये असलेल्या व प्रवाशांसह पर्यटकांचे आकर्षण ठरलेला तामकडा धबधबा प्रवाहित झाला असून या तामकड्याचे जलपूजन संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांनी केले असून हा परिसर पर्यटकांसाठी मोठा आनंददायी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

चंदनापुरी आनंदवाडी येथील तामकडा पाण्याचे जलपूजन डॉ. जयश्री थोरात यांच्या हस्ते झाले यावेळी समवेत थोरात कारखान्याचे संचालक विजय राहणे, कैलास सरोदे, अनिल कढणे, मुरलीधर सरोदे, पप्पू गोसावी ,विनोद राहणे, दगू राहणे, ज्ञानेश्वर सरोदे ,निलेश सरोदे, अर्चना भालेराव,जयसिंग सरोदे, नंदू राहणे ,सोमनाथ सरोदे उपस्थित होते. डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, अकोले संगमनेर तालुका हा सह्याद्री पर्वत रांगांमध्ये वसलेला आहे.

सह्याद्रीच्या या डोंगर रांगांमधून चंदनापुरीचा घाट आणि हा परिसर निसर्गरम्य परिसर ठरला आहे. बाळेश्वर पासून वाहणाऱ्या नदीपासून या घाटामध्ये असलेला तामकडा निर्माण झाला असून पावसाळ्यात प्रवाहित झाला आहे. हिरव्या वनराईच्या कुशीतून पांढराशुभ्र वाहणारा तामकडा हा पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. नाशिक- पुणे महामार्ग हा प्रवासासाठी अत्यंत महत्त्वाचा असून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून हा महामार्ग चौपदरीकरण झाला आहे याचबरोबर आपल्या तालुक्यातून महामार्गाची पूर्ण काँक्रिटीकरण झाले आहे.

अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात येऊन घाटातून अद्यावत रस्ता तयार झाला आहे.या महामार्गावरून प्रवास करत असताना अनेक पर्यटक या ठिकाणी थांबतात निसर्गाचा आनंद घेतात. याचबरोबर संगमनेर तालुका व जुन्नर तालुक्यातूनही अनेक नागरिक या ठिकाणी पर्यटनासाठी येत असतात. तरुणांनी सेल्फी घेताना मोह टाळला पाहिजे, असे आवाहन करताना निसर्गाचा आनंद घेताना सुरक्षितता ही महत्त्वाची असल्याचे त्या म्हणाल्या.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यामधील सर्व गावांमध्ये व परिसरात असलेले ओढे नदी यांच्यावर बंधाऱ्यांचे जाळे निर्माण केले आहे .त्यामुळे मोठी जलसंपत्ती निर्माण झाली आहे. प्रत्येक गावांमधून जास्तीत जास्त बांधारे आणि नालाबर्डींग बांधले असल्याने पाण्याची साठवण होत आहे. पाणीबचत हीच पाणी निर्मिती असून यापुढील काळात कमी पाण्यात जास्त शेती उत्पादन करण्यासाठी शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहनही त्यांनी केले.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.